
वक्तशिरपणा विश्वासार्हता योग्य भाव
धनश्री
रोलींग शटर्स

उत्पादक :-
मे. जयंत
इंजिनिअरिंग वर्क्स,
चाळीसगाव क्रॉसिंग,
मालेगांव रोड,धुळे
फोन नं. २३५१२५, २३६७२५ धुळे- ४२४००१
मो.९४२२२८५४२५,९४२२२८९६२५, ९३२५७१५२२५



दैनिक

# वार्ता

संस्थापक – कै.अतुलभाई जोशी



मुंबई चष्माघर
गल्ली नं.५, पारोळा रोड कॉर्नर, धुळे.
फोन नं.(०२५६२)२३५२२२
मो.९०२१८५३१०८



Postal Regd. No.DHL/62/2024-26

वर्ष ६९ | अंक १७९ | दि.६ जुलै २०२६ सोमवार | धुळे–नंदूरबार | पाने ६ | किंमत २.०० रु.

RNI No.31781/57


## संपादकीय

### पुन्हा एकदा अमन के शांतीदुतांचे पाकिस्तान प्रेम अचानक कसे जागे झाले?

*भारत आणि पाकिस्तान या दोन देशांच्या दरम्यान चर्चा सुरू असल्याच्या बातम्याना सध्या पेव फुटले आहे. आपल्या देशातील साठा पेक्षा अधिक शांतिदूत जागे झाले आहेत. काही प्रतिष्ठित पुरोगामी वर्तमानपत्रातून या बातम्या आणि लेख पेरण्यात आले की भारत आणि पाकिस्तान दरम्यान पडद्याच्या मागे चर्चा सुरू आहे. सध्या इराण कडून मार खाणाऱ्या अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्री असणाऱ्या मार्को रुबीव यांनी गेल्या वर्षाचा दावा केला होता की भारत आणि पाकिस्तान या दोन देशात अज्ञात ठिकाणी चर्चा सुरू आहे. अर्थात अमेरिकन विदेश मंत्र्यांच्या या दाव्याला तात्काळ भारत सरकारने ठोकरून लावले होते. त्यानंतर अशा बातम्या येणे बंद झाले असे झाले नाही. तसेच मुख्य कारण असे की आपल्या देशात अजून असा एक मोठा वर्ग आहे की जो नपुसक मनोवृत्तीचा आहे आणि ज्याला पाकिस्तान बरोबर चर्चा हवी आहे पाकिस्तान बरोबर प्रेमाचे संबंध हवे आहे पाकिस्तानच्या जनतेबरोबर आपल्या देशाच्या नागरिकांचा संवाद हवा आहे. आपल्या बॉलिवूडमध्ये अनेक गायक संगीतकार आणि अभिनेत्यांना वाटते की पाकिस्तानी गायकांनी आपल्याकडे यावे त्यांनी गाणे म्हणावे पाकिस्तानी हीरोइनने आपल्याकडे यावे पाकिस्तानी हिरोनी इकडे येऊन काम करावे वगैरे वगैरे. कलाक्षेत्राच्या देवाण–घेणातून क्रिकेट मुळे क्रीडा क्षेत्राच्या देवाण घेवाणी तून दोन देशाचे संबंध अतिशय मजबूत होतील असली एक भाबडी कल्पना डोक्यात घेऊन वावरणारे एक तर मूर्खाच्या नंदनवनात राहतात नाहीतर त्यांच्यात सामान्य ज्ञानाचा संपूर्ण अभाव आहे असेच म्हटले पाहिजे. आपल्या देशात एक अशी पुरोगामी जमात आहे जी अचानक जागी होते आणि ती तेव्हाच जागी होते ज्यावेळी पाकिस्तान अडचणीत असेल आणि भारत पाकिस्तान वर मात करत असेल सर्वच क्षेत्र त्यावेळी यांचे पाकिस्तान प्रेम जागे होते. पाकिस्तान चारही बाजूने अडचणीत आहे. तिकडे अफगाणिस्तान पाकिस्तानला झोडपून काढतो आहे, बलुचीस्थान मध्ये स्वातंत्र्याचे आंदोलन जबरदस्त पेटलेले आहे. खैबर प्रांत देखील सध्याच्या मुनीर आणि शहाबाज सरकारच्या विरोधात आहे. अमेरिकेने पाकिस्तानचा जेवढा वापर करणे शक्य होते तेवढा केला आहे आणि क्रिप्टो करेंसी च्या माध्यमातून पाकिस्तानी नेते आणि आर्मीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पैसे आपल्या देशात नेले आहे. पाकिस्तानचा तसं म्हटलं तर उपयोग संपलेला आहे कारण इराण युद्धत आता पाकिस्तानच्या भूमिकेला इतके महत्त्व नाही जेवढे कतरच्या भूमिकेला आहे. मुळात इराण संपूर्ण उद्ध्वस्त झाला तरी अमेरिका आणि पाकिस्तानच्या अटी शर्तीवर समझोता करेल असे समजणे ही चुकीचे आहे. पाकिस्तान संकटात आर्थिक दृष्ट्या देखील आहेत दिवाळीखोरीचे उंबरठ्यावर १२ ते १३ टक्के महागाई वाढलेली आहे पेट्रोल डिझेलच्या किमती ३०० च्या आसपास किंवा त्याच्याही पेक्षा पुढे गेलेले आहे आणि पाकिस्तानला सर्वात मोठा धोका आता निर्माण झाला आहे तो पाक व्याप्त काश्मीरचा. ज्याला आपण पी ओ जे के म्हणतो तिथे स्वातंत्र्याचे आंदोलन पेटले आहे. आपल्याकडे नाही का ते काही उदारमतवादी मूर्ख जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालयात छिन के आजादी म्हणून गात होते भारत तेरे तुकडे होंगे हजार म्हणत होते त्यांना पाठिंबा देणारे केजरीवाल राहुल गांधी सारखे आणखी पुरोगामी होते. आता प्रत्यक्ष पाक व्याप्त जम्मू कश्मीर मध्ये जबरदस्त आंदोलन पेटले आहे आणि त्या आंदोलनाचे नेतृत्व करणारे सरदार जे होते त्यांना पाकिस्तानी सेनेने अटक केली परिणामी आता आंदोलन आणखी उग्र झाले आहे. एवढेच नाही तर पाकिस्तानी सेनेने म्हणजेच मुनीर ने आता आंदोलन चिरडून टाकण्यासाठी तिथे अन्नधान्य आणि आता पेट्रोल डिझेल जीवनावश्यक वस्तू पाठविण्यावर देखील बंदी घातली ते ट्रक सारे बाहेर थांबवलेले आहे प्रत्यक्षात पाक अनधिकृत कश्मीरमध्ये उपासमारीची वेळ आली आहे. आता तिथे उघडपणे घोषणा होते आहे की पाकिस्तानचा आमच्याशी काही संबंध नाही आम्ही पाकिस्तानचे घटक राज्य नाही आम्ही स्वतंत्र आहोत आणि पाकिस्तानला आता आमच्याकडून कोणती आशा धरून चालणार नाही आम्ही आमचे दरवाजे उघडू आम्ही आणि भारत आमचे भविष्य निश्चित करू. अमन के शांतिदूत मधला एक माणूस फारूक अब्दुल्ला आहे, जो दावा करीत होता की पाक व्याप्त काश्मीर त्यांच्या तुमच्या बापाचा आहे का वगैरे आता ते सारे जर भारतात यायला एका पायावर तयार झाले आहे आणि ते जी सीमारेषा आहे ती ओपन करून आता आपल्यात मिसळायला तयार झाले आहेत तेव्हा नेमके अमन के शांतिदूत जागे झाले आहे. ही तीच मंडळी जी नेहमी अतिरेक्यांना कव्हर देण्याचे काम करतात. फारूक अब्दुल्लाच्याच मुख्यमंत्रीपदाच्या काळात काश्मीरमध्ये दहशतवाद पेरला गेला रुजवलं गेला आणि तेथून लाखोच्या संख्येने हिंदू पंडितांना घरदार सोडून जावे लागले त्यातील एका गुन्ह्याचा आता परिसर तपास*

(पान ६ वर)

# ऑपरेशन सिंदूरनंतर भारताचा जगात डंका-राजनाथसिंह

## संरक्षण उत्पादनाने १.७८ लाख कोटींचा टप्पा ओलांडला



नवी दिल्ली– ऑपरेशन सिंदूरनंतर भारताने स्वदेशी लष्करी उपकरणांच्या उत्पादनांवर भर दिली. आत्मनिर्भरतेवर लक्ष्य केंद्रीत केल्याने भारताने संरक्षण निर्यातीत सर्व विक्रम मोडले. २०१३–१४ मध्ये केवळ ६८६ कोटी रुपये असलेली निर्यात आता ५७ पटींनी वाढून ३८,००० कोटी रुपयांवर पोहोचली आहे, एकूण उत्पादनाने १,७८,००० कोटींचा टप्पा ओलांडल्याची माहिती संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी दिली. एक्सवरील पोस्टमध्ये त्यांनी सांगितले की, सुमारे ८–९ वर्षांपूर्वीच्या ४६,००० कोटी रुपयांच्या तुलनेत भारताचे संरक्षण उत्पादनाने १,७८,००० कोटींचा टप्पा ओलांडला आहे.

ऑपरेशन सिंदूरनंतर मेड–इन–इंडिया' संरक्षण प्रणालींवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. भारताने संरक्षण निर्यातीचा आकडा लवकरच ४०,००० कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये अनेक स्वदेशी बनावटीच्या संरक्षण प्रणाली आणि शस्त्रास्त्रांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, ज्यामुळे जागतिक स्तरावर भारतीय संरक्षण तंत्रज्ञानाची ताकद दिसून आली. या मोहीमेनंतर स्वदेशी लष्करी उपकरणांच्या निर्मितीला प्राधान्य देण्यात आले. सद्यस्थितीत भारताने लष्करी उपकरणांच्या उत्पादनांचे आणि निर्यातीचे मागील सर्व विक्रम मोडले आहे.

**सुरक्षेसाठी एआयचा वापर**

तिन्ही दलामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्याला सरकारचे प्राधान्य आहे. ड्रोन आणि मानवरहित उपकरणांच्या निर्मितीवर भर दिला जात आहे. नुकतेच सरकारने ५२ हजार कोटींची लष्करी शस्त्रे, हवाई संरक्षण प्रणाली आणि तंत्रज्ञानाच्या खरेदीसाठी मान्यता दिली. येणाऱ्या काळात संरक्षण क्षेत्रात उपयोगात येणाऱ्या एआय आधारित साधनांवर अधिक भर दिला जाणार असल्याचे राजनाथसिंह यांनी म्हटले आहे.

# राम मंदिरातील दान चोरी अयोध्येची झांकी असेल तर काशी मथुरा किती लुटतील? उद्धव ठाकरे



मुंबई –अयोध्येथील श्रीराम मंदिरातील दान चोरीच्या विरोधात उद्धव ठाकरेंची शिवसेना आक्रमक झाली आहे. शिवसेनाउद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून 'रामरक्षा आंदोलन' करण्यात आलं. दादरच्या ऐतिहासिक हनुमान मंदिरात महाआरती तसेच रामरक्षा स्त्रोत आणि हनुमान चालीसा, मारुती स्त्रोत पठणाने राज्यव्यापी आंदोलनाची सुरुवात झाली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी यावेळी भाषण करताना जमलेल्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो अशी सुरुवात केली. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी देशातील तमाम हिंदूंना जागं केलं होतं,विखुरलेल्या एक केलं होतं, आजही तो क्षण आपल्या डोळ्यासमोर आहे.

आपण कट्टर कडवट देशाभिमानी हिंदू आहोत. आम्ही हिंदू भोळे आहोत, भाबडे आहोत पण मूर्ख नाही आहोत, आपल्या हिंदुत्वाचा गैरफायदा घेऊन जर कोणी मंदिर लुटत असेल (पान ६ वर)

# सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेची जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केली पाहणी



धुळे (जिमाका वृत्तसेवा)– धुळे जिल्ह्यातील महत्त्वाकांक्षी सुलवाडे– जामफळ– कनोली उपसा सिंचन योजनेची जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी प्रत्यक्ष पाहणी करून प्रकल्पाच्या कामांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रकल्पातील विविध कामांची प्रगती, कालव्यांची उभारणी, पंपगृहाची स्थिती, बंदिस्त नलिका (पान ६ वर)

# शिरपूर तालुक्यात मतदार यादींचे सखोल पुर्ननिरीक्षण कार्यक्रम सुरू

## मतदारांनी बीएलओंना सहकार्य करावे, शिरपूर तालुका प्रशासनाचे आवाहन

शिरपूर (जिमाका)– भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार धुळे जिल्ह्यात (ड्खठ २०२६) मतदार यादींचे सखोल पुर्ननिरीक्षण कार्यक्रम सुरू झालेला आहे. म्हणुन शिरपूर तालुक्यातील मतदारांनी घरी येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना आवश्यक कागदपत्रे देवून सहकार्य करणे आवश्यक आहे. जे मतदार एन्यूमरेशन फॉर्म भरून देणार नाहीत, त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट होणार नाही याची मतदारांनी नोंद घ्यावी असे आवाहन शिरपूर तालुका प्रशासनाच्या वतीने



करण्यात आले आहे. तसेच या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणी साठी स्थानिक कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याने त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविल्यास ही मोहीम १००% यशस्वी होण्यास मदत मिळणार आहे.

**मतदार यादींचे सखोल पुर्ननिरीक्षण ३० जुलै २०२६ पर्यंत मुदत**

भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडील आदेशानुसार, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धुळे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार यादींचे सखोल पुर्ननिरीक्षण कार्यक्रम धुळे जिल्ह्यात (ड्खठ २०२६) सुरू झालेला आहे. त्या अनुषंगाने दिनांक ३०/०६/२०२६ ते २९/७/२०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय (पान ६ वर)

# राष्ट्रीय बाजार समिती अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल पालकमंत्री ना. जयकुमार रावल यांचा सत्कार

शिरपुर (प्रतिनिधी)– महाराष्ट्र राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री ना. जयकुमार रावल यांची राष्ट्रीय बाजार समिती अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल धुळे भाजपा मा. जिल्हाध्यक्ष तथा नंदुरबार भाजपा जिल्हा प्रभारी बबनराव चौधरी यांनी रविवार (दि. ५ जुलै २०२६) रोजी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत हार्दिक शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी धुळे भाजपाचे माजी जिल्हा सरचिटणीस अरुण धोबी, अनुसूचित जाती मोर्चा माजी जिल्हाध्यक्ष प्रताप सरदार, भाजपा भटके–विमुक्त आघाडी



प्रदेश उपाध्यक्ष रविंद्र भोई, धुळे भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस संजय आसापुरे तसेच आरपीआय (आठवले गट) युवक प्रदेश सचिव नरेश गवळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ना. जयकुमार रावल यांना राष्ट्रीय बाजार समिती अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शुभेच्छा देत त्यांच्या भावी कार्यास यश लाभो, अशा सदिच्छा व्यक्त केल्यात.

# डॉ.पारा घोगरे विज्ञान महाविद्यालयाचा क्विक हील फाउंडेशनसोबत सायबर सुरक्षा सामंजस्य करार

धुळे (प्रतिनिधी)– डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी तसेच विद्यार्थी आणि समाजामध्ये सायबर सुरक्षेबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या डॉ. पारा घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे आणि पुणे येथील क्विक हील फाउंडेशन यांच्यात सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विशेष उपक्रमांतर्गत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, हा उपक्रम महाविद्यालयात सलग



चौथ्या वर्षी राबविण्यात येत असून, मागील वर्षी महाविद्यालय, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कार्य करत राज्यस्तरीय पुरस्कार मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली होती.

या उपक्रमाअंतर्गत नुकतेच पुणे येथे विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, असोसिएट डायरेक्टर अजय शिर्के, सीएसआर प्रतिनिधी गायत्री केसकर, दीपू सिंग तसेच त्यांचे सहकारी यांचे मार्गदर्शन (पान ६ वर)

# नवापूर पोलिसांची अवैध दारू वाहतुकीविरोधात धडक मोहीम



नवापूर (प्रतिनिधी)–नवापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चिंचपाडा गावात अवैध दारू वाहतूक करणाऱ्या दोघांना पोलिसांनी रंगेहात पकडले आहे. त्यांच्याकडून तब्बल १ लाख २६ हजार ८०० रुपये किमतीच्या बियरच्या बाटल्या आणि एक स्कुटी जप्त करण्यात आली आहे. रविवार, दिनांक ५ जुलै २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

**मध्यरात्री जंगलाच्या कार्यालयासमोर सापळा**

मिळालेल्या माहितीनुसार ५ जुलै रोजी रात्री ०१:२० वाजेच्या सुमारास चिंचपाडा ते दुबारफळी रोडवरील फॉरेस्ट ऑफिससमोर काही जण अवैध दारूची चोरटी वाहतूक करणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. यावरून पोलीस शिपाई कांतीलाल काळूसिंग वळवी यांनी सहकाऱ्यांसह त्या ठिकाणी सापळा रचला. यावेळी संशयास्पद रित्या स्कुटीवरून जाणाऱ्या दोघांना थांबवून त्यांची झडती घेतली असता, त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर बियरचे खोके आढळून आले. चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ही बियर नेली जात असल्याचे तपासात उघड झाले आहे.

पोलिसांनी याप्रकरणी (पान ६ वर)

# अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल मध्ये पालक ओरिएंटेशन कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

शिरपूर (प्रतिनिधी)– शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी पालकांसाठी ओरिएंटेशन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा आणि पालक यांच्यात सुसंवाद व सहकार्य अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्या सौ. स्मिता उगले यांनी उपस्थित पालकांना मार्गदर्शन करत शाळेची कार्यपद्धती, शालेय नियम, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एन.ई.पी.) याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासासाठी ऐकणे,



बोलणे, वाचन आणि लेखन (एल.एस.आर.डब्ल्यू) या चार मूलभूत कौशल्यांचे महत्त्व स्पष्ट केले आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालकांच्या सक्रिय सहभागाची गरज अधोरेखित केली. यावेळी विद्यार्थ्यांच्या तंत्रज्ञानाधारित आणि आनंददायी शिक्षणासाठी टुंडेमी किड्स लर्निंग पची माहिती देण्यात आली. या पच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार, प्रभावी आणि आधुनिक पद्धतीने शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार असल्याचे सांगण्यात आले.

यानंतर पालक–शिक्षक संघ (पी.टी.ए.) सदस्यांची निवड करण्यात आली. शाळा आणि पालक यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी करण्यासाठी पी.टी.ए. ची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान सर्व शिक्षकांनी पालकांशी परिचय करून देत आपल्या वर्गातील अध्यापन पद्धती, शैक्षणिक नियोजन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित पालकांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. पालकांनी कार्यक्रमाचे मनापासून कौतुक करत शाळेच्या सर्व शैक्षणिक आणि सहशालेय उपक्रमांना पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

या ओरिएंटेशन कार्यक्रमामुळे पालकांना शाळेची कार्यपद्धती, शैक्षणिक उद्दिष्टे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, भाषिक कौशल्य विकासाचे महत्त्व तसेच टुंडेमी किड्स लर्निंग पच्या वापराबाबत सविस्तर माहिती मिळाली. यामुळे पालक–शिक्षकांमधील संवाद अधिक दृढ होऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांचा सक्रिय सहभाग वाढण्यास निश्चितच प्रोत्साहन मिळणार आहे.

(पान १ वरुन)

*झालेला आहे आरोप पत्र न्यायालयात सादर झालेले आहेत तो खटला आहे सरला भट नावाच्या एका नसता सिस्टर्सचा. यासीन मलिक नाव ऐकले असेल हा तोच शांती देवते की ज्याला तत्कालीन पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग आपल्या घरी भेटत होते कार्यालयात भेटत होते त्यांच्या राहण्याच्या साऱ्या व्यवस्था केल्या होत्या सरकारच्या खर्चाने ते राजधानी दिल्ली त्याचे दुतावासात जाऊन पार्टी खान्याचे काम करायचे देशात राहून देशाचा पैसा घेऊन देशाच्या विरोधात कारस्थान करणारे हे जे हुरियत वाले होते त्यांना याच मंडळींनी पोसले त्यात फारूक पण आहे. मेहबूबा मुफ्ती आहे आणखी ते विनोद शर्मा आहे किंवा असे ६०-६१ लोक आहेत की ज्यांना अचानक पाकिस्तान बद्दल प्रचंड प्रेम निर्माण झालेले आहे. इतिहासापासून काहीही बोध न घेणारे हे अत्यंत विद्वान मूर्ख माणसे जी आहे ती देशाला कायम धोक्यात आणण्याचे काम करतात. मूर्ख हा शब्द या अर्थाने वापरला जातो आहे की वारंवार मार खाल्लयानंतर ही न सुधरणाऱ्या जमातीचे प्रतिनिधित्व करणारे लोक. स्वातंत्र्य लढ्यात देखील मुस्लिम लीगने धोका देण्यापलीकडे काय केले? पाकिस्तानला मुस्लिम लीगने जो इस्लामी गणराज्य म्हणून स्वतंत्र देश दिला पूर्व पाकिस्तान पश्चिम पाकिस्तान दिला त्याचवेळी बलुचिस्तान स्वतंत्र होता तो भारतात मिसळायला तयार होतात तेव्हा कारण सांगितले गेले की भारत आणि बलुचिस्तान मध्ये पाकिस्तान येईल मग कारभार कसा केला जाईल हा तर्क देणारे त्यावेळचे जे राज्यकर्ते होते त्यांनी पूर्व आणि पश्चिम पाकिस्तान मध्ये भारत आहे हे का लक्षात घेतले नाही? मुद्दा एवढाच आहे की आता पाकिस्तान चारही बाजूने अडचणीत आलेले आहे आपण सातत्याने त्याला ठोकून काढलेले आहे. प्रश्न आहे की पाकिस्तान बरोबर शांततेची चर्चा किंवा चर्चा कोणत्या मुद्द्यावर करायची कोणाबरोबर करायची तिथे अधिकृत सरकार कोणाचे आहे लोकांनी निवडून दिलेले का सेनेने बसवलेले आहे? शहाबाद शरीफ आणि त्यांचे राष्ट्रपती जरदारी हे निर्णय घेतात का फील्ड मार्शल मौलाना आसिफ मुनीर घेतो? कोणाबरोबर चर्चा करणार आणि चर्चा करून पदरात काय पडणार? आज पर्यंत जेव्हा जेव्हा आपण पाकिस्तान बरोबर चर्चा केली तेव्हा तेव्हा त्यांनी अतिरेकी कारवाया केल्या देशावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हल्ले केले या पलीकडे काही केलेले नाही. आजही दाऊद इब्राहिम यांच्याकडे आहे तो मसूर अझर तिथेच आहे हाफिज सईदतिथेच आहे शहाबुद्दीन तिथेच आहे भारताला मोस्ट वॉन्टेड आणि जागतिक स्तरावर मोस्ट वाँटेड झालेले सारे गुन्हेगार पाकिस्तानात पोसले जातात सेनेच्या संरक्षणात वावरतात त्यांचे अड्डे आपण ऑपरेशन सिंदूर मध्ये उध्वस्त केले वर्षभराच्या आत पाकिस्तानने नाणेनिधीच्या पैशातून ते उभे करून दिले. का म्हणून पाकिस्तान बरोबर चर्चा करून संबंध सुरळीत करण्याची गरज निर्माण होते आहे? मग घात करणे ज्याच्या स्वभावात आहे प्रवृत्तीत आहे आणि तिथे राज्यकर्त्यांच्या आणि सेनाप्रमुखांच्या नसानसामध्ये आहेत त्यांच्याबरोबर काय चर्चा करायची? मुळात ६१ कथित मान्यवरांना आपल्याकडच्या आणि त्यांच्याकडच्या ५१/५२ असतील त्यांना पत्र लिहिण्याची गरज काय? मनमोहन सिंग यांच्याही आधी श्रीमती इंदिरा गांधी यांनी शिमला करार केला होता ना? ९०००० पेक्षा अधिक आपल्याकडे शरणागती पत्करलेले त्यांचे सैनिक आणि अधिकारी आपण बिन शर्त सोडले होते पण आपले ५६ सोडवण्याचे सौजन्य आपण दाखवले नव्हते आणि त्यांनीही दाखवले नव्हते. त्यानंतर काय झाले? फाशीला लटकले त्यांचे सेना प्रमुख पाकिस्तानचे प्रमुख झाले आणि त्यानंतर पद्धतशीरपणे भारतात शितयुद्ध खेळण्यासाठी अतिरेक्यांची एक फौज निर्माण केली ती काश्मीरच्या माध्यमातून आपल्याकडे पोहोचली कारण ३७० आणि ३५र या कलमांचा सरसकट वापर त्यांनी केला. अजूनही ३७० लागू करा म्हणणारे आपल्या देशात नंदनवनात राहणारे विद्वान आहेतच. पंडित जवाहरलाल नेहरूंनी लियाकत बरोबर करार केला होता पाणी करार त्याचा फायदा पाकिस्तानने घेतला मोबदल्यात आपल्याला काय मिळाले? आपण सातत्याने त्यांच्याबरोबर चर्चा केली. ६५ च्या युद्धानंतर ताश्कंद करार झाला ज्यात आपण आपल्या देशाचा अमूल्य हिरा गमावला लालबहादूर शास्त्री संशयास्पद स्थितीत मृत्युमुखी पडले त्याचे तपास अजून देखील झालेला नाही पण त्या कराराला देखील आपण जिंकलेली भूमी सोडली ना? त्यानंतर पाकिस्तान सुधारले का? कुत्र्याची शेपूट वाकडीच राहते यात काहीही बदल होत नाही हे लक्षात घेतले पाहिजे. अटलजी लाहोर करार करण्यासाठी बसणे थेट लाहोरला गेले नवाज शरीफ यांनी त्यांचे स्वागत केले गळाभेट झाली करार झाला आणि मुशरफ ने काय केले कारगिल घडवले. नरेंद्र मोदींनीही नवाज शरीफ यांच्या नातीच्या लग्नासाठी थेट हजेरी लावली धोका पत्करून संबंध सुधारण्यासाठी काही उपयोग झाला? पहेलगाम चा हल्ला ताजा आहे धर्म विचारून आपल्या २३ नागरिकांना निष्पाप नागरिकांना कुटुंबीयांसमोर त्यांनी ठार मारले आहे आणि तरीही हे शांती दूत चर्चा करायचे आग्रह धरतात तेव्हा यांना आता एकट आवरले पाहिजे नाहीतर तुरुंगात डांबले पाहिजे. देशाच्या सार्वभौमतवाचा देशाच्या स्वाभिमानाचा काही विचार करणार की नाही? पाकिस्तान बद्दल एवढेच प्रेम असेल तर फारूक अब्दुल्ला सहज जे ६१ होते त्यांना पाकिस्तान सरकारने आपल्याकडे आमंत्रित करावे आणि नागरिकत्व बहाल करावे काही हरकत असण्याचे कारण नाही. जो देश आणि ज्या देशाचे राज्यकर्ते जन्मापासून भारताच्या द्वेषाने पछाडलेले आहे ज्यात सुईकर देखील सुधारणा होण्याची शक्यता नाही त्यांच्याबरोबर चर्चा करा सांगण्याचे धाडस होते कसे?*

(पान १ वरुन)

## राम मंदिरातील दान चोरी अयोध्येची झांकी असेल तर काशी मथुरा किती लुटतील? उद्धव ठाकरे

तर मी परवाच बोललोय अब हिंदू माफ नही करेगा. या देशाची सत्ता घेताना जय श्रीरामच्या घोषणा दिल्या गेल्या, मंदिर वही बनायेंगे पण तेव्हा शिवसैनिकांनी जेवढं काम केलं मला नाही वाटत तेवढं दुसऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केलं असेल. शिला पूजन, रथयात्रा, अयोध्येत जाऊन कार सेवा केली होती, असं उद्धव ठाकरे यांनी सांगितलं.

**हिंदू आजही भरडला जातोय**

मुंबई शहरानं जे भोगलं ते क्वचित एखाद्या शहरानं भोगलं असेल. बॉम्बस्फोट झाले, दंगली झाल्या, तेव्हा देशातील एकच मर्द शिवेसनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हिंदूंच्या पाठीशी उभा राहिला होता. हिंदू भयग्रस्त होता, हिंदू आक्रमित होता, तेव्हा आधार शोधत होता, त्यावेळेला शिवसेनेचा भगवा शिवसेनाप्रमुखांनी शिवसैनिकांच्या हातात दिला. गैरफायदा घेतला गेला, नको ती लोकं सत्ता भोगत आहेत, हिंदू आजही भरडला जातोय,असं उद्धव ठाकरे म्हणाले.

**ही अयोध्येची झांकी असेल तर काशी मथुरा किती लुटतील**

बारा वर्ष झालीत, आज आपण ज्यासाठी मेहनत केली होती.ती व्यक्ती पंतप्रधानपदी बसली आणि बसल्यानंतर कट्टर, कडवट हिंदुत्ववादी शिवसेनेला नष्ट करण्यासाठी जणू काही अफजलाखानी विडा उचलला. का उचलला कारण हिंदुत्वाचा गैरफायदा घ्यायचा होता. हिंदुत्वाचा गैरफायदा घेताना शिवसैनिक, एकच शिवसेना देशात अशी आहे, समोर उभी राहून निधड्या छातीनं त्यांना प्रश्न विचारु शकेल. काय वातावरण होतं, अयोध्या तो झांकी है, काशी मुथरा बाकी है. मला आता भीती वाटायला लागली, ही अयोध्येची झांकी असेल तर काशी मथुरा किती लुटतील, असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला.

बारा वर्षात आपल्या भगव्याचं सरकार तिकडं आलं असताना आपल्याला वाटत होतं, अब हिंदू मार नही खायेगा, मात्र हिंदूंना लुटणारं सरकार तिथं बसलंय हे आपलं दुर्भाग्य आहे. पहिली सुरुवात शंकराचार्यांनी केली, केदारनाथातील सोनं लुटलं गेलं. मध्यप्रदेशातील मुख्यमंत्र्यांवर उज्ञैनमधील जमीन लुटली गेल्याचे आरोप झाले. बद्रीनाथमध्ये पण चोरीच्या बातम्या येत आहेत. अयोध्येत एक आयएएस ऑफिसर बोलतात, आईचे सोन्याचे दागिने वितळवले आणि एक किलोचा सोन्याचं मुलामा असलेलं रामचरितमानस गायब झालं, नऊ नऊ तास बसवलं जातं पण उत्तर दिलं जात नाही. शिवसेनेनं फुल ना फुलाची पाकळी म्हणून काही पैसे दिलेले, चांदीच्या विटा दिलेल्या, कुठे गेलं सगळं, असा सवाल उद्ध ठाकरेंनी केला.

(पान १ वरुन)

## शिरपूर तालुक्यात मतदार यादींचे सखोल पुर्ननिरीक्षण कार्यक्रम सुरू मतदारांनी बीएलओंना सहकार्य करावे

अधिकारी (इ डज) आपल्या घरोघरी येऊन एर्पीशीरींळेप त्री वाटप व संकलित करणार आहे. त्यासाठी सर्व मतदारांनी आपला पासपोर्ट साईज फोटो व आवश्यक कागदपत्रे बीएलओ यांना द्यायची आहेत . जे मतदार एत्र त्री भरून देणार नाहीत त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट होणार नाही याची नोंद घ्यावी.

**प्रभावी अंमलबजावणीसाठी लोकप्रतिनिधी व कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची**

या राष्ट्रीय कामासाठी सर्वांनी तात्काळ एत्र भरून राष्ट्रीय कामात सहकार्य करावे, या मोहिमेच्या जनजागृतीसाठी ग्राम पातळीवर तलाठी, ग्रामपंचायत अधिकारी, सहा. कृषी अधिकारी व स्थानिक शासकीय यंत्रणासह प्रतिष्ठित नागरिक, आजी माजी लोकप्रतिनिधी यांनी स्थानिक शिबीरात सहभागी व्हावे. समाजात विविध स्तरावर समुपदेशन, प्रबोधन करावे. या मोहिमेत त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. म्हणुन त्यांनी सक्रिय सहभाग देत मतदान पुर्ननिरीक्षण कार्यक्रम (ड्खठ) यशस्वी करावा असे आवाहन शिरपूर तालुक्याचे उपविभागीय अधिकारी, शरद मंडलिक, तहसीलदार महेंद्र माळी , यांनी केले आहे.

सदर मोहिमे च्या ठिकाणी भामपूर, अंतुर्ली, वाघाडी या ठिकाणी तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी महेंद्र माळी यांनी इडज यांच्या कामाची तपासणी करून मार्गदर्शन केले आहे.

## सारंगखेडा-टाकरखेडा दरम्यानच्या तापी नदीवरील पुलाची पहिल्याच पावसात दैना



शहादा (प्रतिनिधी)- शहादा-दोंडाईचा रस्त्यावरील व नंदुरबार-धुळे या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या सारंगखेडा-टाकरखेडा दरम्यानच्या तापी नदीवरील पुलाची बुधवारी (दि.१ जुलै) झालेल्या पहिल्याच पावसात दैना उडाली. पुलावरील पाण्याच्या निचऱ्यासाठी बसवलेल्या जाळ्यां मध्ये माती, वाळू आणि मुरुमाचा गाळ अडकल्याने पुलावर मोठ्या प्रमाणात पाणी साचून अक्षरशः तलावाचे स्वरूप निर्माण झाले होते.

या धोकादायक परिस्थितीमुळे वाहनधारकांचा जीव टांगणीला लागला असताना, टाकरखेडा येथील युवक मनोज पानपाटील आणि त्यांच्या मित्रांनी भर पावसात स्वतः पुढाकार घेतला. त्यांनी पुलावरील जाळ्यांमधील माती व कचरा काढून पाण्याचा निचरा मोकळा केला. या युवकांच्या समयसूचकते मुळे मोठा अनर्थ टळला असून, वाहनधारकांनी त्यांचे भरभरून कौतुक केले.

**दरवर्षीचीच समस्या, प्रशासन सुस्त**

स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त करत सांगितले की, ही समस्या काही नवीन नाही. दरवर्षी पावसाळ्यात याच पुलावर पाणी तुंबते. तरीही राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून पावसाळ्यापूर्वी आवश्यक ती साफसफाई का केली जात नाही, असा सवाल उपस्थित होत आहे. पुलाच्या कठड्याजवळ गेल्या अनेक महिन्यांपासून माती, वाळू पडून आहे, त्याकडे दुर्लक्षच करण्यात आले.

**तुटलेले कठडे अपघाताला निमंत्रण**

धक्कादायक बाब म्हणजे, या पुलावरील टाकरखेड्याच्या दिशेने दोन ठिकाणी कठडे पूर्णपणे तुटून त्यांची दुरवस्था झाली आहे. या महत्त्वाच्या पुलावरून दिवस-रात्र मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू असते. तुटलेल्या कठड्यांजवळून च वाहने जात असल्याने भविष्यात मोठा अपघात होण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

**कायमस्वरूपी उपायाची मागणी:**

तात्पुरती साफसफाई नको, तर या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. हा प्रश्न केवळ पाणी साचण्याचा नसून थेट नागरिकांच्या जीविताशी व सुरक्षेशी निगडित आहे. त्यामुळे आता तरी राष्ट्रीय महामार्ग विभागाला जाग येणार का, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

(पान १ वरुन)

## सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेची जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केली पाहणी

पाईपलाईन तसेच प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेतला. संबंधित अधिकाऱ्यांनी कामांच्या सद्यस्थितीबाबत माहिती दिली.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी कामांची गुणवत्ता राखून प्रलंबित कामे नियोजित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिल्या. तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीत कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले.

सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजना पूर्ण झाल्यानंतर धुळे जिल्ह्यातील मोठ्या क्षेत्राला सिंचनाची सुविधा उपलब्ध होणार असून शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रकल्पाची कामे गतीने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यावर भर देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिल्या.

पाहणीदरम्यान सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन कार्यकारी अभियंता संदीप पवार,लघुपाटबंधारे विभाग धुळे,कार्यकारी अभियंता स्वप्निल गांगुर्डे , तहसीलदार शिंदखेडा नितीन कुमार देवरे, सहाय्यक कार्यकारी अभियंता विक्रम पवार, सहाय्यक अभियंता विशाल खैरनार,संबंधित विभागाचे अधिकारी, अभियंते तसेच प्रकल्पाशी संबंधित अधिकारी उपस्थित होते.

(पान १ वरुन)

## डॉ.पारा घोगरे विज्ञान महाविद्यालयाचा क्विक हील फाउंडेशनसोबत सायबर सुरक्षा सामंजस्य करार

लाभले.

तसेच क्विक हीलचे संस्थापक बंधू कैलास काटकर आणि संजय काटकर यांच्या संघर्षमय प्रवासाची प्रेरणादायी कहाणी विद्यार्थ्यांसमोर मांडत सामाजिक जबाबदारी, नवोपक्रम आणि सायबर सुरक्षेचे महत्त्व अधोरेखित केले.

महाविद्यालयातून प्रा. डॉ. स्वाती बोरसे यांच्या नेतृत्वाखाली सायबर क्लबचे अधिकारी पूजा देवरे, ओम सोनार, नंदिनी सोनवणे आणि हिमांशू रघुवंशी यांनी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले.

या प्रशिक्षणानंतर महाविद्यालयातून १६ सायबर वॉरियर्सची निवड करण्यात येणार असून, हे विद्यार्थी पुढील दोन महिन्यांत संपूर्ण धुळे जिल्ह्यात शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, सामाजिक संस्था आणि विविध सार्वजनिक ठिकाणी सायबर सुरक्षेबाबत जनजागृती अभियान राबविणार आहेत. ऑनलाइन फसवणूक, डिजिटल व्यवहारातील सुरक्षितता, सोशल मीडिया वापर, ओटीपी आणि बँकिंग फसवणूक यांसारख्या विषयांवर नागरिकांना मार्गदर्शन करून सुरक्षित डिजिटल समाज घडविण्यास ते योगदान देणार आहेत.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाबद्दल संस्थेचे चेअरमन मा. बाबासाहेब कुणाल पाटील तसेच उपाध्यक्ष मा. भैय्यासाहेब एस. टी. पाटील यांनी निवड झालेल्या विद्यार्थी व प्राध्यापकांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

सायबर सुरक्षेबाबत जागरूक नागरिक घडविणे ही काळाची गरज असून, विद्यार्थीच समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरू शकतात. धुळे जिल्ह्यात सायबर गुन्हे रोखण्यासाठी आणि सुरक्षित डिजिटल वातावरण निर्माण करण्यासाठी हा उपक्रम निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

(पान १ वरुन)

## नवापूर पोलिसांची अवैध दारू वाहतुकीविरोधात धडक मोहीम

दोन आरोपींना अटक केली आहे: १) सुभाष कालीचरण वर्मा (वय २३, सध्या राहणार: उदना स्टेशन, सुरत; मूळ राहणार: बुडहा, ता. सांगिपूर, जि. प्रतापगड, उत्तर प्रदेश). २) हर्षल सुनील वसावे (वय २५, राहणार: चिंचपाडा, ता. नवापूर, जि. नंदुरबार).

**१ लाख २६ हजारांचा मुद्देमाल जप्त**

पोलिसांनी कारवाई दरम्यान खालील मुद्देमाल हस्तगत केला आहे: ट्युबर्ग स्ट्रॉंग बियर (टीन): ५०० मिलीचे ३८४ सीलबंद टीन (१६ खाकी खोके) - किंमत ५७,६००/- ट्युबर्ग स्ट्रॉंग बियर (काचेच्या बाटल्या): ६५० मिलीच्या ९६ काचेच्या बाटल्या (८ खाकी खोके) - किंमत १९,२००/- वाहन: लाल रंगाची मेस्ट्रो स्कुटी (क्रमांक चक ३९ ठ ८८२७) - किंमत ५०,०००/- एकूण जप्त किंमत: १,२६,८००/-

**गुन्हा दाखल व पुढील तपास**

याप्रकरणी फिर्यादी पोलीस शिपाई कांतीलाल वळवी यांच्या तक्रारीवरून नवापूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५६६/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई), १०८, ८३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवापूर पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक दिनेश प्रल्हाद शिरसाट यांनी गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) अशोक वळवी करत आहेत. परिसरात अवैध धंदे करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

शिरपूर शहर व तालुक्यातील बातम्या व जाहिरातींसाठी संपर्क
जितेंद्र शेटे
विजय बुक स्टॉल,शिरपूर
मो.नं.९८५०५२४६८२, ९४२१२७६९८२







पाहिजेत
सुशिक्षित, होतकरू व निर्व्यसनी लॉज कामाकरिता साफसफाई कामा करिता रुम बॉय पाहिजे. भेटा-
संकल्प लॉज
डॉ. आंबेडकर चौक, जेल रोड, धुळे










न्यायालयीन नोटीसा प्रसिध्दीसाठी धुळे-नंदुरबार जिल्ह्यातील एकमेव वृत्तपत्र
दैनिक वार्ता

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक श्री.आशुतोष अतुल जोशी यांनी अलका प्रिंटर्स आंबेडकर चौक, जेलरोड, धुळे येथे मुद्रीत करुन दैनिक वार्ता कार्यालय, जेलरोड, धुळे-४२४००१ येथून प्रसिध्द केले आहे.Dhule RNI.No. 31781/57 NEW DEHLI धुळे कार्यालय-फोन नं.२८००२२, २३५२९२ फॅक्स नं.(०२५६२) २८०६ २२ संपादक श्री.आशुतोष जोशी, सहसंपादक-श्री.अजय जोशी,मानद सहसंपादक-रविंद्र पंड्या. नंदुरबार कार्यालय-डॉ.दिपक जानवे-प्रतिनिधी शांतीनिकेतन, गणपती रोड,नंदुरबार. RNI.No. MAH MAR/2010/ 36081 मो.नं.९४२२ ७८९५८५,९४२१६१ ७१००
Email-dvarta @rediffmail.com,dvarta99 @gmail.com. (www.dainikwarta.in)

# हस्ती ग्रुप ऑफ स्कूल तर्फे ग्राफिक डिझाईन व नाट्यकला विषयावर ' एक्सप्लोरर प्रोग्राम - करिअर मार्गदर्शन व समुपदेशन सत्रचे यशस्वी आयोजन



दोंडाईचा – हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती पब्लिक स्कूल व ज्यु. कॉलेज, हस्ती वर्ल्ड स्कूल व हस्ती गुरुकुल दाऊळ शिवार दोंडाईचा येथील विद्यार्थ्यांकरिता ग्राफिक डिझाईन व नाटचकला क्षेत्रातील संधी या विषयावर ' एक्सप्लोरर प्रोग्राम – करिअर मार्गदर्शन व समुपदेशन सत्रचे हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच ग्राफिक डिझायनिंग आणि मनोरंजन क्षेत्रातील नाट्यकलेचे महत्व लक्षात घेता त्याच्या संधी लक्षात घेता हे सत्र आयोजित केले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी विरेंद्र पाटील नाटचकलावंत, लेखक, दिग्दर्शक व क्रेझी क्रिएशनचे संचालक हे स्त्रोत व्यक्ती उपस्थित होते. यावेळी हस्ती पब्लिक स्कूलच्या प्राचार्या रझिया दाऊदी, हस्ती वर्ल्ड स्कूलचे प्राचार्य जिवन सपकाळे, मुख्याध्यापक सदाशिव महाजन, प्रशासकीय अधिकारी रेखा गाडेकर आदी उपस्थित होते.

हस्ती पब्लिक स्कूलचे इ. ९ वी तर हस्ती वर्ल्ड स्कूल व हस्ती गुरुकुल चे इ. ८ वी व ९ वीचे विद्यार्थ्यांकरिता या सत्राचे आयोजन करण्यात आले. यांत ग्राफिक डिझायनिंग क्षेत्रातील विविध संधी व नाट्य क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता आत्मसात करावयाची कौशल्यांचा विकास घडवणे हा या कार्यक्रमामागील उद्देश होता.

या कार्यक्रमात ग्राफिक डिझायनिंगची कौशल्य व व संधींचा उलगडा मान्यवरांनी केला. व्यक्ती कलात्मक दृष्टिकोनातून उत्तम ग्राफिक डिझाईन बनवू शकतो. त्याकरिता आपल्या अंगी सर्जनशीलता असणे आवश्यक आहे असे संबोधिले. या क्षेत्रात विविध प्रतिष्ठित कंपन्यांची लोगो तयार करणे, त्याचबरोबर आकर्षक पॅकेजिंग डिझाईन व प्रिंटिंग फॉरमॅट तयार करून देणे डिजिटल मीडिया निमेशन यु. आय. यु. एक्स. डिझाईन सोशल मीडिया मार्केटिंग यांतील भरपूर संधी असल्याचे स्पष्ट केले. आपल्याला तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उत्तम करिअर घडवता येते असे विविध उदाहरणे देत स्पष्ट केले.

त्यासोबतच व्यक्ती हा जन्मतः अभिनेता असतो फक्त त्याकरिता उपजत गुण व संधी मिळाली तर नटसम्राट घडू शकतो असे सांगत नाट्य क्षेत्राला आवश्यक कौशल्यांची माहिती दिली. यात नाट्यकलेत नामांकित नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा म्हणजे राष्ट्रीय ललित कला केंद्र याविषयी माहिती देत परीक्षेचे स्वरूप स्पष्ट केले.

या सत्रात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात मान्यवरांना प्रश्न विचारत मनातील शंका मांडल्या. मान्यवरांनी अत्यंत समर्पक व सुलभ भाषेत शंकांचे निरसन केले. मान्यवरांचे अनुभव विद्यार्थ्यांकरीता प्रेरणादायी ठरले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद पवार यांनी तर आभार राहुल भामरे यांनी मांडले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता स्वप्निल माळी, सचिन पाटील, सागर गोराणे, विकास राजपूत यांनी परिश्रम घेतले.

हस्ती स्कूलच्या वतीने आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या अंगी कला, कौशल्यांचा विकास साधण्यासाठी व व्यक्तिमत्व विकास तसेच आत्मविश्वास वाढवण्यासाठी अशा उपक्रमांचे नियमित आयोजन केले जाते.

# पत्रकारांना अक्षेपार्ह भाषा वापरल्याने संजय दिना पाटील यांचा निषेध तसेच पत्रकारांना धमकी देणे व त्यांच्यावरील होणारे हल्ले थांबवावे.

वर्षावाडी – जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथील शिवसेना शिंदे गटाचे खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकाराबाबत केलेले अपमानास्पद वक्तव्य अत्यंत दुर्देवी व काळीमा फासणारे आहे. पत्रकारांना अक्षेपार्ह भाषा वापरणे धमकी देणे पत्रकार हे गोरगरीबांच्या माहितीसाठी प्रश्न विचारातात हे त्यांचे घटनात्मक व व्यवसायीक कर्तव्य आहे. त्यांच्यापुढे अक्षेपार्ह भाषा वापरणे, त्यांना धमकी देणे, पत्रकारांवर वारंवार होणारे हल्ले हे घातक आहे. तसेच यापुढे मारहाण करणाऱ्यांवर देखील लवकरात लवकर कठोरातील कठोर कार्यवाही करण्यात यावी असे मोहाडी उपनगर येथील जेष्ठ नागरिक श्री. सतिष (आबा) अर्जुन पाटील यांचे कडून निषेध व्यक्त करण्यात येत आहे. यापुढे कोणत्याही पत्रकाराला

## लोक वार्ता

अपमानास्पद, धमकी, मारहाण, शिवीगाळ हल्ला केल्यास कधीही अन्याय सहन करणार नाही.

तसेच पत्रकार व कार्यालयावर होत असलेल्या हल्यांवर शासनाने लक्ष केंद्रीत करणे ही काळाची गरज ठरत आहे. निःपक्षपातीपणे कार्य करणाऱ्या व सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या सर्वसामान्य जनतेचा आरसा लोकशाहीचा आधारस्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वृत्तपत्र क्षेत्राची आवस्था अतिशय दयनिय होत आहे. वृत्तपत्र लेखक, पत्रकार, संपादक व फोटोग्राफर, प्रेस कार्यालयांवर होणाऱ्या हल्यांचे प्रमाण वाढले आहे. तरीही संबंधीत बाबींवर शासन दखल घेतांना दिसत नाही.

पत्रकारांना अपमानास्पद, शिवीगाळ, हल्ला करणे, धमकी देणे मारहाण करणे असले प्रकार त्वरीत थांबवावे अशी अपेक्षा मोहाडी उपनगर, वर्षावाडीचे जेष्ठ नागरिक श्री. सतिष (आबा) अर्जुन पाटील यांनी व्यक्त केली.

# तन आणि मन निरोगी असेल तरच, जीवनाचा सर्वानंद घेता येतो - सौ.ऊमाताई घुगे

धुळे – नशिबाने मिळालेल्या मानव जन्माचा नि:खळ आनंद शेवट पर्यत घ्यायचा असेल, तर आपलं शरीर आणि आपलं मन सरार्थाने तंदुरुस्त असणं गरजेचं आहे, असे प्रतिपादन निव्रुत्त असि. मेट्रन व समाज प्रबोधक सौ. उमाताई महेश घुगे यांनी , साने गूरुजी जेष्ठ नागरिक संघाच्या कार्यालयात संपन्न झालेल्या व्याख्यानात प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना केले.

साने गुरुजी जेष्ठ नागरिक संघांतर्गत, कुल स्वामिनी जेष्ठ महिला संघ आणि ईनरव्हिल क्लब आफ धुळे क्रास रोड, यांच्या संयुक्त विद्यमाने , जेष्ठ महिलांनी आरोग्याची काळजी कशी घ्यावी या विषयावर, आयोजित केलेल्या व्याख्यानात ,उमाताई घुगे बोलत होत्या.

कुल स्वामिनी जेष्ठ महिला मंडळाच्या अध्यक्षा अरुणा शिरोडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या व्याख्यानात, उमाताई घुगे यांनी, जेष्ठ महिलांनी सर्वार्थाने तंदुरुस्त रहाण्यासाठी, नियंत्रित, सात्विक आहार, पुरेशी झोप, अत्यावश्यक झेपेल




येवढ्या शारिरीक हालचाली, मन मोकळं करण्यासाठी विश्वासू सखी, निसर्गाचा आनंद लुटणे, नियमित आरोग्य तपासणी,आदी महत्वपूर्ण बाबींचा ऊहापोह करीत, मार्गदर्शन केले.

या वेळी,मंडळाच्या उपाध्यक्षा सुमन महाले यांनी, मी वड बोलतोय, ही कविता सादर केली. विनोद दिनाचे औचित्य साधुन, सर्वस्वी, रेखा बारी, शोभा बोराडे, शोभा शेंडे, प्रकाशिनी गंगेले यांनी वातावरण उल्हासित करणारे विनोद सांगितले.

सीमा अग्रवाल, शोभा येवले, कल्पना साळूंकें, प्रमिला पाटील, रत्नमाला येवला, मंगला येवले, विजया पिंगळे, सुमन देव, यांचे जन्म दिन यावेळी साजरे करत त्यांना शुभेच्छा प्रदान करण्यात आल्या.

मंडळाच्या उपाध्यक्षा सुमन महाले, पुष्पजया पाटोळे, वैशाली वाणी,सुलोचना देव, शोभा बोराडे, प्रकाशिनी गंगेले, खजिनदार शितल शेंडे, रुद्र घुगे आदिंनी कार्यक्रम यशस्वितेसाठी योगदान दिले. मंडळाच्या सचिव रेखा बारी यांनी कार्यक्रमाचे सुत्र संचालन केले. पसायदानाने कार्यालयाची सांगता झाली.

# बिल्डर्स असोसिएशन धुळे तर्फे रेनवॉटर हार्वेस्टिंग सेमिनार

धुळे – बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे शाखा तसेच फुराट कंपनीच्या सहकार्याने आयोजित रेन वॉटर हार्वेस्टिंग जनजागृती सेमिनार हॉटेल कृष्णाई येथे नुकताच उत्साहात संपन्न झाला. पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरवा धुळे जलसमृद्ध करा या संकल्पनेवर आधारित हा सेमिनार आयोजित करण्यात आला होता. धुळे जिल्हा हा अल्प पर्जन्यमान व वारंवार भेडसावणाऱ्या पाणीटंचाईसाठी ओळखला जातो. त्यामुळे रेन वॉटर हार्वेस्टिंग ही केवळ कायदेशीर आवश्यकता नसून भविष्यातील जलसुरक्षेची प्रभावी गुरुकिल्ली आहे असा ठाम संदेश या सेमिनारमधून देण्यात आला. वाढते शहरीकरण, घटणारी भूजल पातळी आणि भविष्यातील पाण्याची वाढती गरज लक्षात घेता प्रत्येक निवासी, व्यावसायिक व औद्योगिक प्रकल्पामध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक असल्याचे मान्यवरांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री भटू पवार साहेब नगररचनाकार, धुळे यांनी महाराष्ट्र शासनाच्या नियमांनुसार रेन वॉटर हार्वेस्टिंगचे महत्त्व स्पष्ट करताना प्रत्येक नवीन बांधकामामध्ये त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख प्रायोजक फुराट कंपनीचे संचालक इब्राहीम खान सुरत यांनी आधुनिक रेन वॉटर हार्वेस्टिंग तंत्रज्ञान, त्याचे दीर्घकालीन फायदे आणि जलसंवर्धनासाठी उद्योग क्षेत्राची सामाजिक जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा अक्षय पी. मुंडके अध्यक्ष बिल्डर्स असोसिएशन ऑफ



इंडिया धुळे शाखा होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात धुळे सेंटरच्या माध्यमातून जलसंवर्धनाबाबत जनजागृती वाढविण्यासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल, असे सांगून प्रत्येक सदस्याने आपल्या प्रकल्पात रेन वॉटर हार्वेस्टिंगला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन आनंद बाळापुरकर सचिव, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे यांनी केले.यावेळी माजी अध्यक्ष सुनील मुंदडा, कुणाल सोनार, माजी आशिष अग्रवाल, दिपक शेलार, संदीप सैन्दाणे शेषराज जाधव, समीर बहाळकर, मनपा अभियंता प्रकाश सोनवणे, इंजी. कमलेश सोनवणे, धनंजय अहिरे, मोहिनीस पाटील, हेमराज कोते, यतीन सर, तसेच बिल्डर्स असोसिएशन धुळे शाखेचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फुराट कंपनीचे मोलाचे सहकार्य लाभले. कंपनीचे संचालक इब्राहीम खान यांचे बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे शाखेच्या वतीने विशेष आभार व्यक्त करण्यात आले. तसेच उपस्थित सर्व मान्यवर, सदस्य आणि सहभागी यांचेही आयोजकांनी मनःपूर्वक आभार मानले. धुळेकरांना रेन वॉटर हार्वेस्टिंग करून घेण्यासाठी मोफत मार्गदर्शन धुळे शाखे द्वारा करण्यात येणार आहे त्यासाठी संपर्क ९३५९३९१४०० क्रमांक देण्यात आला आहे.

# नगावच्या गंगामाई अभियांत्रिकी महाविद्यालयात 'खानदेश एआय टेक्नो हब' एआय युगात संशोधनात्मक दृष्टीकोन वाढवा - प्रा.डॉ.एस.एस.राजपूत



नगाव – नगाव एज्युकेशन सोसायटी संचालित गंगामाई अभियांत्रिकी महाविद्यालयात 'खानदेश एआय टेक्नो हब'चे शानदार उद्घाटन सोहळा उत्साहात झाला. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवर संधी उपलब्ध करून देण्यासाठी हे हब प्रभावी व्यासपीठ ठरेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

या उद्घाटन सोहळ्याला कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एस. एस. राजपूत प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेंद्र डी. दुबे, उपप्राचार्य डॉ. जी. एम. पोद्दार, 'एआय टेक्नो हब'चे समन्वयक प्रा. दिनेश भारोटे, विभाग प्रमुख प्रा. नरेंद्र बोरसे, प्रा. डॉ. व्ही. एस. चौधरी, प्रा. डॉ. राहुल पाटील, प्रा. डॉ. विनोद कुमार पाटील, प्रा. नितीन पाटील आणि पीआरओ चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

### 'एआय हब संशोधनासाठी प्रभावी व्यासपीठ'

प्रमुख अतिथी प्रा. डॉ. एस. एस. राजपूत म्हणालेत, सध्याचे युग हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे आहे. विद्यार्थ्यांनी या आधुनिक तंत्रज्ञानाचा अंगीकार करून संशोधनात्मक दृष्टीकोन वाढवावा. नवनिर्मित खानदेश एआय टेक्नो हब यासाठी अत्यंत प्रभावी व्यासपीठ ठरेल. उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील दरी कमी करण्यासाठी असे हब महत्त्वाचे आहेत.

### रोजगाराच्या संधी

अध्यक्षीय भाषणात सिनेट सदस्य डॉ. एस. आर. पाटील यांनी स्पष्ट केले की, विद्यापीठाच्या वतीने अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांना नेहमीच प्रोत्साहन दिले जाईल. तंत्रज्ञानातील बदल स्वीकारून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जागतिक पातळीवर स्पर्धा करावी. एआय, मशीन लर्निंग, डेटा सायन्स या क्षेत्रात रोजगाराच्या अमर्याद संधी आहेत.

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध

प्राचार्य डॉ. शैलेंद्र डी. दुबे यांनी विश्वास व्यक्त केला की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना रोजगाराच्या आधुनिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी गंगामाई अभियांत्रिकी महाविद्यालय आणि हे नवीन एआय हब नेहमीच कटिबद्ध राहील. हबमधून विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट, इंटर्नशिप आणि स्टार्टअपसाठी मार्गदर्शन मिळेल.

उपप्राचार्य डॉ. जी. एम. पोद्दार यांनी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात प्रगती साधण्याचे आवाहन केले. समन्वयक प्रा. दिनेश भारोटे यांनी हबच्या भविष्यातील उपक्रमांची माहिती दिली.

### मान्यवरांच्या शुभेच्छा

या टेक्नोहबसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी, नगाव एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन तथा आमदार राघवेंद्र (राम) मनोहर भदाणे, संस्थेचे सचिव बाळासाहेब मनोहर भदाणे आणि उपाध्यक्षा ज्ञानज्योती भदाणे यांनी विशेष शुभेच्छा दिल्यात.

### खानदेशातील विद्यार्थ्यांना संधी

प्रा.हर्षल देशमुख यांसी सूत्रसंचालन प्रा. हर्षल देशमुख केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. हबमुळे खानदेशातील विद्यार्थ्यांना एआय क्षेत्रातील अद्ययावत प्रशिक्षण, कार्यशाळा व संशोधनाच्या संधी मिळणार आहेत.

# धुळे एस.व्ही.के.एम. एन.एम.आय.एम.एस. ग्लोबल युनिव्हर्सिटी मध्ये बी.टेक कॉस्मेटिक टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम सुरू

धुळे – धुळे येथील एस.व्ही.के.एम. एन.एम.आय.एम.एस. ग्लोबल युनिव्हर्सिटी मध्ये बी.टेक कॉस्मेटिक टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

बदलत्या जीवनशैलीमुळे आणि सौंदर्य, आरोग्य व वैयक्तिक निगा याबाबत वाढलेल्या जागरूकतेमुळे कॉस्मेटिक उद्योग जगातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या उद्योगांपैकी एक ठरला आहे. स्किन केअर, हेअर केअर, मेकअप, हर्बल व आयुर्वेदिक उत्पादने, परफ्यूम, वैयक्तिक निगा उत्पादने आणि वेलनेस क्षेत्राची वाढ दिवसेंदिवस होत असून या क्षेत्रात प्रशिक्षित तज्ज्ञांची मोठ्या प्रमाणावर मागणी निर्माण झाली आहे. हीच भविष्यातील गरज ओळखून एसव्हीकेएम एनएमआयएमएस ग्लोबल युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ फार्मसी अँड टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट (एसपीटीएम), धुळे येथे विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक बी.टेक. (कॉस्मेटिक टेक्नॉलॉजी) हा उद्योगाभिमुख पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

प्राचार्य डॉ. समीर गोयल म्हणाले, भारतातील कॉस्मेटिक आणि पर्सनल केअर उद्योग वेगाने विस्तारत असून या क्षेत्रात कुशल व तांत्रिकदृष्ट्या सक्षम मनुष्यबळाची मागणी सातत्याने वाढत आहे. हीच गरज लक्षात घेऊन एसव्हीकेएम एनएमआयएमएस ग्लोबल युनिव्हर्सिटीमध्ये बी.टेक कॉस्मेटिक टेक्नॉलॉजी हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. आधुनिक प्रयोगशाळा, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम, अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन, संशोधनाच्या संधी आणि प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षण यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना केवळ उत्कृष्ट नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणार नाही, तर त्यांच्यामध्ये यशस्वी उद्योजक घडविण्याची क्षमता



देखील विकसित करेल. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी या भविष्याभिमुख अभ्यासक्रमाचा लाभ घेऊन आपल्या उज्ज्वल करिअरची पायाभरणी करावी, असे आवाहन आम्ही करीत आहोत. बी.टेक (कॉस्मेटिक टेक्नॉलॉजी) पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी कॉस्मेटिक फॉर्म्युलेशन सायंटिस्ट, रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑफिसर, क्वालिटी श्युरन्स ऑफिसर, क्वालिटी कंट्रोल एक्झिक्युटिव्ह, प्रॉडक्शन एक्झिक्युटिव्ह, पॅकेजिंग डेव्हलपमेंट इंजिनिअर, रेग्युलेटरी अफेअर्स एक्झिक्युटिव्ह, प्रॉडक्ट डेव्हलपमेंट सायंटिस्ट, टेक्निकल सेल्स एक्झिक्युटिव्ह, ब्रँड डेव्हलपमेंट मॅनेजर अशा विविध प्रतिष्ठित पदांवर लोरिअल, युनिलिव्हर, प्रॉक्टर अँड गॅम्बल (पी अँड जी), हिंदुस्तान युनिलिव्हर (एचयूएल), डाबर, हिमालया, लोटस हर्बल्स, इमामी, पतंजली, गोदरेज कन्झ्युमर प्रॉडक्ट्स, मॅरिको, बेअर्सडॉर्फ (निव्हिया), जॉन्सन अँड जॉन्सन यांसारख्या देशातील व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित कंपन्यांमध्ये करिअरच्या उत्कृष्ट संधी उपलब्ध होऊ शकतात. या क्षेत्रात आकर्षक वेतन, वेगवान करिअर प्रगती आणि जागतिक स्तरावर काम करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळू शकते. या अभ्यासक्रमाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उद्योजकतेच्या संधी. शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी स्वतःचा सौंदर्यप्रसाधन, हर्बल, स्किन केअर, हेअर केअर किंवा वैयक्तिक निगा उत्पादनांचा उद्योग सुरू करू शकतात. भारत सरकारच्या 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या उपक्रमांमुळे या क्षेत्रातील उद्योजकतेलाही मोठे प्रोत्साहन मिळत आहे

बारावी विज्ञान (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित अथवा जीवशास्त्र) उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू असून प्रवेश क्षमता मर्यादित आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांनी विलंब न करता प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे. डॉ आरती बेलमगवार (९८२२९ २७०८४), प्रा. गौरव चव्हाण (९१७२०८४३१७) यांच्याशी संपर्क साधावा कळविण्यात आले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६
## बळीराजाच्या आर्थिक पुनरुत्थानासाठी राज्य शासनाचे ऐतिहासिक पाऊल

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही कृषी क्षेत्रावर आधारित आहे. राज्यातील लाखो शेतकरी शेती आणि शेतीपूरक व्यवसायांवर आपली उपजीविका अवलंबून ठेवतात. मात्र, गेल्या काही वर्षांत अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील चढ–उतार आणि नैसर्गिक आपत्ती यासारख्या परिस्थितीचा सर्वाधिक परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर झाला असून अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६' जाहीर करून शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे.

**कर्जमुक्तीची आवश्यकता**

शेती हा निसर्गावर अवलंबून असलेला व्यवसाय आहे. पावसाचे अनिश्चित स्वरूप, हवामान बदलाचे परिणाम, उत्पादन खर्चातील वाढ आणि शेतीमालाला हमीभाव न मिळाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना घेतलेले पीक कर्ज वेळेवर फेडणे शक्य झाले नाही. परिणामी त्यांच्यावर थकबाकी वाढत गेली आणि नव्याने कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांना पुन्हा बँकिंग व्यवस्थेशी जोडण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरत आहे.

**योजनेची उद्दिष्टे**

पात्र शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून मुक्त करणे.
शेतकऱ्यांची पत पुनर्स्थापित करून नव्याने पीक कर्ज उपलब्ध करून देणे.
कृषी उत्पादनात सातत्य राखणे.
ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणे.
नियमित कर्जफेडीला प्रोत्साहन देणे.
डिजिटल व पारदर्शक पद्धतीने लाभ वितरित करणे.

**योजनेची ठळक वैशिष्ट्ये**

या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदत पीक कर्जाची माफी करण्यात येणार आहे. शासनाने निश्चित केलेल्या कालावधीत घेतलेल्या व पात्र ठरणाऱ्या पीक कर्जांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.याशिवाय, नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांसाठी ५० हजार प्रोत्साहनपर लाभाची तरतूद करण्यात आली आहे. दीर्घकाळ थकीत असलेल्या काही प्रकरणांमध्ये एकरकमी तडजोडीची (OTS) सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**ग्रीस्टॅकद्वारे पारदर्शक अंमलबजावणी**

योजनेची अंमलबजावणी अधिक परिणामकारक आणि पारदर्शक करण्यासाठी ग्रीस्टॅक प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. शेतकऱ्यांची जमीन, पीक, बँक खाते, आधार क्रमांक आणि कर्जाची माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध होत असल्याने पात्र लाभार्थी निश्चित करणे सुलभ झाले आहे.ही प्रणाली भविष्यातील विविध कृषी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठीही महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**बँका आणि सहकारी संस्थांची जबाबदारी**

या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका, ग्रामीण बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. लाभार्थ्यांची माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करणे, कर्ज खात्यांची पडताळणी करणे, शेतकऱ्यांना आवश्यक माहिती देणे आणि शासनाच्या सूचनांनुसार कार्यवाही करणे ही जबाबदारी संबंधित संस्थांवर आहे.

**बँकेनी व्याजाची आकारणी करू नये**

राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना–२०२६' अंतर्गत पात्र लाभार्थ्यांच्या थकीत कर्ज रकमेवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि विविध कार्यकारी सहकारी संस्था (विकास संस्था) यांनी १ एप्रिल २०२६ ते प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंतच्या कालावधीत व्याज आकारणी करण्यात येणार नाही.

**शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी**

योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आधार क्रमांक बँक खात्याशी जोडलेला असल्याची खात्री करावी. ग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करावी. बँकेत उपलब्ध कर्जाची माहिती पडताळून घ्यावी.आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करावीत. शासनाकडून प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना**

शेतकऱ्यांचे कर्ज कमी झाल्यामुळे त्यांची क्रयशक्ती वाढते. त्याचा सकारात्मक परिणाम कृषी निविष्ठांच्या विक्रीवर, ग्रामीण उद्योगांवर, बाजारपेठांवर आणि रोजगारनिर्मितीवर होतो. त्यामुळे ही योजना केवळ शेतकऱ्यांसाठीच नव्हे तर ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठीही महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**समृद्ध शेतीकडे वाटचाल**

कर्जमुक्तीबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, जलसंधारण, पीक विविधीकरण, कृषी प्रक्रिया उद्योग, शेतकरी उत्पादक कंपन्या (FPO), सेंद्रिय शेती आणि मूल्यवर्धन यांसारख्या उपक्रमांचा स्वीकार केल्यास शेतकरी अधिक सक्षम होतील. शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेतल्यास उत्पन्नवाढीस मोठी मदत होऊ शकते.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६' ही महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राला नवी दिशा देणारी योजना आहे. कर्जमुक्तीमुळे शेतकऱ्यांचा आर्थिक ताण कमी होईल, नव्याने पीक कर्ज उपलब्ध होईल आणि कृषी क्षेत्राला नवसंजीवनी मिळेल. आर्थिकदृष्ट्या सक्षम, तंत्रज्ञानाभिमुख आणि आत्मनिर्भर शेतकरी घडविण्याच्या दिशेने ही योजना महत्त्वपूर्ण ठरेल. बळीराजाचा विकास म्हणजेच राज्याचा विकास या विश्वासातून राबविण्यात येणारी ही योजना ग्रामीण महाराष्ट्राच्या प्रगतीचा नवा अध्याय लिहिणारी ठरेल.

**संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय,धुळे**

# सदाशिव नगरात झाडांचा वाढदिवस उत्साहात साजरा वृक्षारोपण .मोहिमेचा शुभारंभ; ५,०५१ वृक्ष लागवडीचा संकल्प



धुळे – वृक्षारोपण करायचे असेल, तर त्या वृक्षाचा वाढदिवसही साजरा केला पाहिजे या अभिनव संकल्पनेतून सदाशिव नगर येथे पूर्वी लावण्यात आलेल्या वृक्षांचा वाढदिवस आज धन्वंतरी मेडिकल फाउंडेशन व श्रमप्रतिष्ठा गुणगौरव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

धन्वंतरी मेडिकल फाउंडेशन व श्रमप्रतिष्ठा गुणगौरव समिती यांच्या वतीने दरवर्षी सांगाल तिथे वृक्षारोपण – अट एकच, त्या वृक्षाचा वाढदिवस साजरा करायचा ही सामाजिक व पर्यावरणपूरक मोहीम राबविण्यात येते. या उपक्रमामुळे वृक्षांची केवळ लागवड न होता त्यांचे संवर्धन आणि संगोपन करण्याची प्रेरणा समाजात निर्माण होत आहे.

यावर्षी सदाशिव नगर येथे लावण्यात आलेल्या वृक्षांचा वाढदिवस स्किन स्पेशालिस्ट,धन्वंतरी मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष व योग शिक्षक डॉ. जगदीश गिंदोडिया तसेच श्रमप्रतिष्ठा गुणगौरव समितीचे अध्यक्ष महेश (बाबा) घुगे यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. याच प्रसंगी यंदाच्या वृक्षारोपण मोहिमेचाही मान्यवरांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात श्री श्री सदाशिव महादेव मंदिरात मान्यवरांच्या हस्ते महाआरतीने झाली.

त्यानंतर सर्व उपस्थितांनी हिरव्यागार वृक्षांना प्रेमाने आलिंगन देत निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त केली आणि पर्यावरणाचे संरक्षण तसेच निसर्गाची कृपा अखंड राहावी यासाठी प्रार्थना केली.

यावेळी यंदाच्या वर्षात ५,०५१ वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला या कार्यक्रमात महेश (बाबा) घुगे, डॉ. जगदीश गिंदोडिया, देवीदास लोहालेकर, पंढरीनाथ चित्ते, एस. टी. चौधरी, डी. व्ही. पाटील, दिनकर पाटील, राजेंद्र शिंपी, दिलीप वाघ, भास्कर भामरे, रमेश मोरे, सुदाम पाटील, विलास पाटील, आर. एन. पाटील, एच. ए. पाटील, एच. ओ. पाटील तसेच अनेक योगसाधक व पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे विशेष पथकाचे शिरपूर विधानसभेतील विखरण मंडळातील विखरण व बाळदे येथे संघटनात्मक चर्चासत्र संपन्न

शिरपूर – भारतीय जनता पक्ष महाराष्ट्रचे प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण यांनी राज्यभरातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पक्ष संघटनेची सद्यस्थिती तसेच शेतकऱ्यांच्या व सामान्य शेवटपर्यंतच्या माणसाचे अडचणी जाणून घेण्यासाठी विशेष पथके नियुक्त केली आहेत. त्यानुसार शिरपूर विधानसभा मतदारसंघातही पक्षाचे विशेष पथक दाखल झाले असून, या पथकात अजिंक्य जाधव, नरेंद्र पाटील, अक्षय देशमुख व अक्षय दळवी यांचा समावेश आहे.



शिरपूर ग्रामीण मधील विखरण मंडळ बाळदे व विखरण गावी पथक दाखल झाले. माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, भाजपा जिल्हाध्यक्ष बापू खलाणे, नंदुरबार भाजपा प्रभारी बबनराव चौधरी, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, शिरपूर विधानसभा प्रमुख के. डी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा विखरण मंडळ अध्यक्ष भरत पाटील यांनी बाळदे येथे बैठकीचे आयोजन केले.

नियुक्त केलेल्या पथकाच्या माध्यमातून कार्यकर्त्यांच्या शेतकऱ्यांच्या सामान्य जनतेच्या व्यथा, भावना आणि संघटनात्मक अडचणी जाणून घेण्याचा उपक्रम सुरू केला आहे. सदर पथक शिरपूर विधानसभा मतदारसंघातील गावोगावी जाऊन बूथस्तरीय कार्यकर्त्यांच्या बैठका घेत आहे. विविध राजकीय विषयांसह संघटनात्मक बाबींवर चर्चा करून कार्यकर्त्यांचे मनोगत जाणून घेतले जात आहे.

यावेळी ग्रामीण अध्यक्ष भरत पाटील, माजी पं. स. उपसभापती जगतसिंग राजपूत, विखरण सरपंच कवरदास पाटील, बाळदे उपसरपंच निंबा पाटील, कुवबा माजी संचालक निंबा पाटील, भाजपा सरचिटणीस योगेंद्रसिंग सिसोदिया व इंजि. अजिंक्य शिरसाठ, उपाध्यक्ष जयसिंग राणा व दशरथ पाटील, युवा भाजपा कार्यकर्ते दुष्यन्त पाटील, वनावल गट व जातोडा गणातील सर्व बूथ प्रमुख, रविंद्र राजपूत, लिलाचंद पाटील, गुलाब राजपूत, अनिल पाटील, प्रविण राजपूत, भूषण पाटील, दीपक राजपूत बोरगांव, राकेश राजपूत, निलेश देशमुख, साकवद येथील मनोज भिल, गिधाडे सरपंच डॉ. सुरेश पाटील, बाभुळदे उपसरपंच संजय पाटील, उप्परपिंड सरपंच योगेश पाटील, बाळदे विकासो चेअरमन हिरामण पाटील, अमृत पाटील, किरण पाटील, रोहित सोनवणे, मोतीराम पाटील, नारायण पाटील, तसेच विखरण गटातील अरुण पाटील, रवींद्र पाटील, काशिनाथ पाटील, मनोज पाटील, श्रीकांत निकम, काशिनाथ पाटील, मधुकर मराठे, सुरेश भिल, चंद्रकांत पाटील, धोंडू पाटील, मगन धनगर, भीमराव पाटील, जयदेव अहिरे तसेच भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**

My Old Name Was **Israr Ahmed Mukhtr Ahmed** My New Name Is **Israr Ahmad Mukhtar Ahmad Ansari** My Address - S.No.575/1, Plot No.-33, Hafiz Siddik Nagar, Near Masjid Md. Hasan, Dhule - 424001

**CHANGE OF NAME**

My Old Name Was **Ayesha Bano Binte Shamsuddin** My New Name Is **Bibi Ayesha Israr Ahmad Ansari** My Address - S.No.575/1, Plot No.-33, Hafiz Siddik Nagar, Near Masjid Md. Hasan, Dhule - 424001

प्रोसेस जमा | ॲड.जयश्री पी.पंचभाई | निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज.नं.६८५/२०२६

श्रीमती शोभादेवी रामकृष्ण सोनार वगैरे २ ...... अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....... जाबदेणार
कै.रामकृष्ण गंगाधर सोनार, मृत्यु दि.२६/१०/२०२५,
मृत्यु ठिकाण – धुळे ....... मयत

**कायदेशिर वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी (Legal Heirship Certificate)**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी मयत कै. रामकृष्ण गंगाधर सोनार, यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला मिळणेकामी मे कोर्टात दाखल केला आहे.

त्या अर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथील मे. दिवाणी न्याया. सो. क स्तर कोर्ट नं. १....यांचे कोर्टात दिनांक २८/७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदर कामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेख स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवुन वरील अर्जदार यांना मयत कै. रामकृष्ण गंगाधर सोनार, यांचे कायदेशिर वारास म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देणेबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राह्य धरण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि. २/७/२०२६ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

(कोर्टाचा शिक्का)

कामगिरी कारकून, दिवाणी न्यायालय, व.स्तर, धुळे
आदेशावरून, अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, धुळे

प्रोसेस जमा | ॲड.आनंद यु.मोहिते, धुळे | नि.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. व.स्तर यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज.नं.६८९/२०२६

१. कांतीलाल दौलत देवरे (मयत)
वारस – १अ) श्रीमती कमल कांतीलाल देवरे, वगैरे ...... अर्जदार
वि.
कोणीही नाही ....... जाबदेणार
कै. दौलत कमल कांतीलाल देवरे, वगैरे
मृत्यु समय पत्ता – ५४ अ संत सेना नगर देवपुर, धुळे ....... मयत

ज्याअर्थी दिनांक ०१/०७/२०२६ रोजी सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वरील अर्जदार हे मयत कै. दौलत रुपला देवरे यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यासंदर्भात वारस दाखला (लिगल हेअरशीप सर्टीफिकेट) मिळावा म्हणून सदरचा अर्ज धुळे न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता चौकशी तारीख ०१/०८/२०२६ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारसांना व इतर संबंधितांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, याबाबत कोणास काही वाद, हरकत असल्याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क.स्तर क्रमांक १ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थित न झाल्यास सदरकामी कोणाचीही, काहीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येवून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर तकारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. कोर्टाचे सही–शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक – ०४/०७/२०२६

(कोर्टाचा शिक्का)

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, धुळे
आदेशावरून, अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, धुळे

## जाहिर नोटीस

**म.तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळोदा यांचे न्यायालयात**
**प्रकरण क्र./जन्म/मृत्यु नोंद अर्ज/फौज/पे.नो/कावि–२४५/२०२६**

श्री/श्रीमती सुहाना बी अशपाक अली,
रा.तळोदा, ता.तळोदा, जि.नंदुरबार ...... अर्जदार/वादी
विरूध्द
निबंधक जन्म–मृत्यु तथा मुख्याधिकारी नगर परिषद,
तळोदा, ता.तळोदा, जि.नंदुरबार ....... गैरअर्जदार

**जन्म– मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ (सुधारण अधिनियम २०२३) मधील कलम–१३ (२) व (३) प्रमाणे जन्म–मृत्यु दाखल्यास हरकती संबंधी जाहीर नोटीस**

या नोटीसीद्वारे तमाम नागरीकांना कळविणेत येते कि, ज्याअर्थी अर्जदार यांनी मे कोर्टात जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारणा अधिनियम २०२३)चे कलम १३(२)(३) प्रमाणे जन्म – मृत्यु नोंदणी संदर्भात अर्ज केलेला असुन अर्जदार यांनी त्यांची/ त्यांचे/त्यांचा/ स्वतः नामे सुहाना बी अशपाक अली यांच्या जन्म दिनांक – २०/११/२००६ रोजी तळोदा, ता. तळोदा जि.नंदुरबार येथे झाल्या बाबत त्यांच्या अर्जात नमुद केले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास सदर अर्जा संबंधी हरकत, तक्रार, म्हणणे द्यावयाचे असेल त्यांची सुनावणी – (पेपर नोटीस प्रसिध्द केल्या पासुन १५ दिवसांनी) दिनांक– / /२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. तुम्ही स्व:त अगर वकीलां मार्फत म.कार्यकारी दंडाधिकारी तळोदा यांचे दालनात हजर होऊन आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा सदर अर्जासंबंधी कोणाचीही तक्रार नसल्याचे गृहीत धरुन अर्जाचे सुनावणीचे कामकाज पुढे चालविले जाईल याची नोंद घ्यावी.

नमुद कालावधी नंतर येणाऱ्या आक्षेप / तक्रार हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच कोणतीही हरकत / आक्षेप / तक्रार या कार्यालयास प्राप्त न झाल्यास जन्म मृत्यु नोदंणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार नोंदीच्या अर्जाबाबत निर्णय घेण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस ही माझे सही व शिक्यानिशी आज रोजी दिली असे.

तळोदा
दिनांक – ३०/०६/२०२६

(कोर्टाचा शिक्का)

कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार तळोदा

**न्यायालयीन नोटीसा प्रसिध्दीसाठी धुळे–नंदुरबार जिल्ह्यातील एकमेव वृत्तपत्र**
**दैनिक वार्ता**

ॲड.एम.एन.खर्डे, शहादा | नि.६

## जाहिर नोटीस

**शहादा येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. (व.स्तर) यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज.नं.२६६/२०२६

राजबाई गजानन निकुंभ, वय ३६, धंदा–घरकाम,
रा.पुरूषोत्तम नगर, ता.शहादा, जि.नंदुरबार ...... अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ........ सामनेवाला
कै.गजानन पंडित निकुंभ, मृत्यु दि. ०५/०५/२०२६ ....... मयत

**अर्ज – दि बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चॅप्टर VIII चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेसाठी.**

ज्याअर्थी अर्जदाराचे पती कै. गजानन पंडित निकुंभ हे मौजे शहादा, ता. शहादा, जि. नंदुरबार येथील रहिवासी होते व त्यांचा मृत्यु दि. ०५/०५/२०२६ रोजी रूरल हॉस्पिटल, साक्री, ता. साक्री, जि. धुळे येथे झाला असुन त्यांचे पश्चात त्यांना वारस क्र. १) राजबाई गजानन निकुंभ – पत्नी, २) चेतना गजानन निकुंभ – मुलगी, ३) गायत्री गजानन निकुंभ – मुलगी, ४) भाग्यश्री गजानन निकुंभ – मुलगी, ५) तन्मय गजानन निकुंभ – मुलगा हे कायदेशीर वारस असल्याने वर नमूद अर्जदाराने सन १८२७ चे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट मधील ८ चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी शहादा येथील म. दिवाणी न्यायाधिश सो. (व. स्तर) यांचे कोर्टात दि. ३/७/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील अर्जासंदर्भात कोणास काही म्हणणे अगर हरकत असल्यास ते दि. १३/८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः अगर वकिलांमार्फत शहादा येथील म. दिवाणी न्यायाधिश सो. (व. स्तर) शहादा यांचे न्यायालयात हजर राहुन लेखी सादर करावे. अन्यथा सदर अर्जाच्या बाबतीत कोणाचीही काहीएक तक्रार नाही असे गृहीत धरण्यात येवुन पुढील योग्य ते हुकूम करण्यात येतील यांची नोंद घ्यावी.

आज तारीख ४/७/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी सदरची जाहिर नोटीस दिली असे.

(कोर्टाचा शिक्का)

क.लिपीक, दिवाणी न्यायालय व.स्तर, शहादा
आदेशावरून., अधिक्षक, दिवाणी न्यायालय व.स्तर शहादा

6/D

## जाहिर नोटीस

**धडगांव येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो, क.स्तर यांचे न्यायालयात**

दि.कि.अर्ज.नं.६८/२०२६

१. अंतिप उदयसिंह डोडवे, वय ३२, धंदा–मजुरी,
रा.वडफळ्या भिमनगर, ता.अक्राणी, जि.नंदुरबार ...... अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....... सामनेवाला
कै.उदयसिंह भुरा डोडवे (मयत) दि.०४/०९/२०२५

**अर्ज–बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ भाग ८ प्रमाणे वारस दाखला मिळणेकामी**

ज्या अर्थी कै. उदयसिंग भुरा डोडवे यांचा मृत्यू नंतर एकमेव कायदेशीर त्याचे वारस म्हणून अर्जदार क्र. ०१ हे असल्याने, अर्जदार क्र. ०१ ह्यांना महसूल दप्तरी व शासकीय योजनांचा लाभ घेण्याकामी वारस असल्याचा अर्ज केला आहे. सदर अर्जाचे कामी दि. १४/७/२०२६ रोजी पुढील चौकशी कामी तारीख नेमण्यात आलेली आहे. सदर अर्जाबाबत अर्जदार क्र. ०१ यांचे मयत कै. उदयसिंग भुरा डोडवे यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळणे बाबत कोणाचीही काही हरकत असल्यास अगर अधिकार असल्यास त्यांनी चौकशीच्या दिवशी सकाळी १०:३० वाजता स्वतः अगर वकीला मार्फत धडगांव येथील में. दिवाणी न्यायाधीश साहेब 'क'. स्तर यांचे कोर्टात हजर होऊन हरकत नोंदवावी सदर दिवशी चौकशीकामी कोणीही न हरकत नोंदवल्यास अर्जाचे कामी होऊन निकाल दिला जाईल. कळावे,

आज तारीख १२/०६/२०२६ रोजी आमची सही निशी व म.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिला आहे.

(कोर्टाचा शिक्का)

कामगिरी कारकून, दिवाणी व फौजदारी न्यायालय धडगांव
आदेशावरून, सहा.अधिक्षक, दिवाणी व फौजदारी न्यायालय धडगांव

## जाहिर नोटीस

**धडगांव येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो, क.स्तर यांचे न्यायालयात**

वारस अर्ज नं. ३९/२०२६

१. वन्या टेडगा तडवी, उ.व. ३८ वर्ष धंदा – शेती
२. सायसिंग टेडगा तडवी, उ.व.५४ वर्ष धंदा – शेती
३. दिवल्या टेडगा तडवी, उ.व.५१ वर्ष धंदा – शेती
४. नारसिंग टेडगा तडवी, उ.व.५० वर्ष: धंदा शेती
५. रमेश टेडगा तडवी, उ.व. ४४ वर्ष धंदा शेती
६. रोत्या टेडगा तडवी, उ.व. ४७ वर्ष धंदा – शेती
७. सुनिताबाई दारासिंग पटले, उ.व. ३६ वर्ष धंदा– शेती
८. गिरनाबाई बाज्या मोरे, उ.व.४८ वर्ष धंदा – शेती

अर्जदार क्र. ०१ ते ०८ रा. काकरदा ता. अक्राणी जि. नंदुरबार ...... अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....... सामनेवाला
कै.टेडगा मोत्या तडवी (मयत) दि.०६/१२/२०२५

**अर्ज–बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ भाग ८ प्रमाणे वारस दाखला मिळणेकामी**

या जाहीर नोटीस द्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते कि,

ज्या अर्थी कै.टेडगा मोत्या तडवी यांचा मृत्यू नंतर एकमेव कायदेशीर त्याचे वारस म्हणून अर्जदार क्र. ०१ ते ०८ हे असल्याने, अर्जदार क्र. ०१ ते ०८ ह्यांना महसूल दप्तरी व शासकीय योजनांचा लाभघेण्याकामी वारस असल्याचा अर्ज केला आहे. सदर अर्जाचे कामी दि. १७/०७/२०२६ रोजी पुढील चौकशी कामी तारीख नेमण्यात आलेली आहे. सदर अर्जाबाबत अर्जदार क्र. ०१ ते ०८ मयत कै. टेडगा मोत्या तडवी यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळणे बाबत कोणाचीही काही हरकत असल्यास अगर अधिकार असल्यास त्यांनी चौकशीच्या दिवशी सकाळी १०:३० वाजता स्वतः अगर वकीला मार्फत धडगांव येथील में. दिवाणी न्यायाधीश साहेब 'क'. स्तर यांचे कोर्टात हजर होऊन हरकत नोंदवावी सदर दिवशी चौकशीकामी कोणीही न हरकत नोंदवल्यास अर्जाचे कामी होऊन निकाल दिला जाईल. कळावे,

आज तारीख ०४/०७/२०२६ रोजी आमची सही निशी व म.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिला आहे.

(कोर्टाचा शिक्का)

कामगिरी कारकून, दिवाणी व फौजदारी न्यायालय धडगांव
आदेशावरून, सहा.अधिक्षक, दिवाणी व फौजदारी न्यायालय धडगांव

# दैनिक वार्ता

वर्ष-१५, अंक- १७९ दि. ६ जुलै २०२६, सोमवार किंमत २ रू. MAHMAR / 2010/36081

नंदुरबार जिल्हा आवृत्ती ■ दि. ६ जुलै २०२६


## दिनेश नाईक यांची भारतीय आदिवासी स्वाभिमानी सेनेच्या जिल्हा उपअध्यक्ष' पदी निवड; संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडित तडवी यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान



नंदुरबार (प्रतिनिधी)– भारतीय आदिवासी स्वाभिमानी सेना या राष्ट्रीय संघटनेने नंदुरबार जिल्हा उपाध्यक्ष म्हणून दिनेश नाईक यांची नियुक्ती केली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडित आर. तडवी यांच्या असते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. भारतीय आदिवासी स्वाभिमानी सेना ही आदिवासी, दलित, भटके विमुक्त, ओबीसी, अल्पसंख्याक व पीडित महिलांच्या हक्क व न्यायासाठी लढणारी आघाडीची संघटना म्हणून ओळखली जाते. गंगाराम सोनवणे गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील वंचित घटकांच्या प्रश्नांवर आवाज उठवत आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत संघटना मजबूत करण्यासाठी ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे. नियुक्तीपत्रात राष्ट्रीय अध्यक्ष मा. पंडितभाऊ तडवी यांनी म्हटले आहे की, आपल्या अनुभवाचा उपयोग संघटना बळकटीसाठी करून संविधानिक अधिकारांसाठी आपण संघर्ष कराल, अशी अपेक्षा आहे. दिनेश नाईक यांच्या निवडी बद्दल जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जिल्ह्यात आदिवासी समाजाच्या मुलभूत प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांचे नेतृत्व निर्णायक ठरेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# शहादा येथील के.व्ही.पटेल कृषी महाविद्यालयात कृषी दिन साजरा



शहादा (प्रतिनिधी) – महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्न पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या के.व्ही. पटेल कृषी महाविद्यालयात १ जुलै रोजी 'कृषी दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कृषी दिनानिमित्त तालुक्यातील सात गावांमध्ये खेती बचाव अभियान राबविण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश पटेल यांच्या हस्ते कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. कृषी दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातर्फे परिसरातील शेतकऱ्यांसाठी 'खेती बचाव अभियान' राबविण्यात आले.

या अभियानांतर्गत शहादा तालुक्यातील तिखोरा, मोहिदा त.ह., अलखेड, चिखली, कानडी, पाडळदा आणि म्हसावद या सात गावांमध्ये एकाच वेळी भव्य शेतकरी मेळाव्यांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या मेळाव्यांमध्ये महाविद्यालयातील विषय विशेषज्ञ प्राध्यापक आणि अंतिम वर्षाच्या 'रावे' (ठ-थए) अंतर्गत कार्य करणाऱ्या कृषी दूत व कृषी कन्यांनी शेतकऱ्यांना मातीचे महत्त्व, माती तपासणी व जमिनीची सुपीकता सुधारणे याविषयी सखोल व तांत्रिक मार्गदर्शन केले.

शहरालगतच्या ग्रामीण भागात खालीलप्रमाणे विविध ठिकाणी हे मेळावे संपन्न झाले. तिखोरा येथील त्रिंबकेश्वर महादेव मंदिरात प्रा. अनिल पाटील यांनी मार्गदर्शन केले. अलखेड येथील श्रीराम मंदिरात प्रा. कृणाल पाटील यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली. चिखली व कानडी येथील समाज गृहात डॉ. सचिन चौधरी यांनी संवाद साधला. पाडळदा येथे मुरली मनोहर मंदिरात प्रा. विलास पाटील यांनी मार्गदर्शन केले. मोहिदा त.ह. येथील श्रीकृष्ण मंदिरात प्रा. विजय सपकाळ यांनी तांत्रिक माहिती दिली. म्हसावद येथील धनगर मढी परिसरात डॉ. भरत चौधरी यांनी उपस्थित शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले.

या मेळाव्यां दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या विशेष कृषी प्रदर्शनाला परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने भेट दिली.

या प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी शेती क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान, आधुनिक अवजारे आणि पीक पद्धती जाणून घेतल्या.महाविद्यालयाने थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत जाऊन राबविलेल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल सर्वच गावांतील शेतकऱ्यांनी कमालीचे समाधान व्यक्त केले.

हा नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वी करण्यासाठी पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बापूसाहेब दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील, समन्वयक प्राध्यापक मकरंद पाटील, संचालक मयूर पाटील तसेच प्राचार्य डॉ. प्रकाश पटेल यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# विशेष सखोल मदार पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यास सुरवात-दीपक गिरासे



शहादा (प्रतिनिधी)– ०२ शहादा विधानसभा मतदारसंघात भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल मतदार पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे, अशी माहिती मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी दीपक गिरासे यांनी दिली. यावेळी सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार संभाजी पाटील उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचा पहिला टप्पा २० जूनपासून सुरू झाला असून दुसरा टप्पा ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत राबविला जाणार आहे. ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत मतदारांविषयी तक्रारी स्वीकारल्या जातील. आवश्यक प्रकरणांमध्ये संबंधितांना नोटीस देऊन सुनावणी घेतली जाईल व ७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत प्राप्त दावे व हरकतींवर निर्णय घेतला जाईल.

शहादा विधानसभा मतदारसंघात एकूण ३६६ मतदान केंद्रे असून त्यापैकी शहादा तालुक्यात २२७ आणि तळोदा तालुक्यात १३९ केंद्रांचा समावेश आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ३६६ बूथ लेव्हल अधिकारी (इडज) नियुक्त करण्यात आले आहेत. प्रत्येक इडज किमान तीन वेळा घरोघरी भेट देणार आहे. यावर देखरेख ठेवण्यासाठी २७ पर्यवेक्षीय अधिकारी, शहादा येथे १८ व तळोदा येथे ९, नियुक्त केले आहेत.मतदार यादी अचूक, अद्ययावत व सर्वसमावेशक करण्यासाठी नागरिकांनी इडज यांना आवश्यक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत आणि या पुनरीक्षण कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी दीपक गिरासे तसेच सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार, शहादा व तळोदा यांनी केले आहे.

# महेंद्र पब्लिक स्कूल, नंदुरबार येथे राष्ट्रीय डॉक्टर्स डे उत्साहात साजरा

नंदुरबार (प्रतिनिधी)–महेंद्र पब्लिक स्कूल, नंदुरबार येथे राष्ट्रीय डॉक्टर्स डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या संचालिका सौ. पिनल शाह उपस्थित होत्या. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. आकाश पाटील दंततज्ज्ञ, नंदुरबार, डॉ. दिनेश पाटील (नेत्रतज्ज्ञ), डॉ. सुधीर पाटील (जनरल फिजिशियन) आणि डॉ. माधवभाई पाटील जनरल फिजिशियन, उपस्थित होते. तसेच शाळेचे प्राचार्य अरुण पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर अनेक वर्षांपासून समाजाला समर्पित वैद्यकीय सेवा देणाऱ्या मान्यवर डॉक्टरांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी डॉ. आकाश पाटील यांनी विद्यार्थ्यांना दातांचे आरोग्य, स्वच्छता आणि नियमित दंत तपासणीचे महत्त्व समजावून सांगितले. दातांची योग्य काळजी घेण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच



डॉ. दिनेश पाटील यांनी डोळ्यांची योग्य काळजी कशी घ्यावी, संतुलित आहार, स्वच्छता आणि स्क्रीनचा मर्यादित वापर याविषयी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण माहिती दिली. शाळेच्या संचालिका सौ. पिनल शाह यांनी आपल्या मनोगतात डॉक्टरांचे समाजातील अनन्यसाधारण योगदान अधोरेखित केले. त्या म्हणाल्या की, डॉक्टर हे देवाचे रूप असतात. ते आपल्या ज्ञान, सेवा आणि समर्पणातून समाजाचे आरोग्य जपतात. त्यांच्या कार्याचा सन्मान करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. या प्रसंगी उपस्थित सर्व मान्यवर डॉक्टरांच्या हस्ते शाळेतील शिक्षकांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच ऑलिम्पियाड परीक्षेत राज्यस्तरावर उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थिनी कु. विधी नानकानी व कु. युर्वी शर्मा यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका सौ. भूमिका मॅडम आणि शिक्षक सुष्मित शेमले यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली.

राष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली तसेच डॉक्टरांविषयी आदरभाव अधिक दृढ झाला.

# चावरा इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये इन्व्हेस्टिचर सेरेमनी उत्साहात संपन्न

नंदुरबार (प्रतिनिधी)–येथील चावरा इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्याच्या उद्देशाने इन्व्हेस्टिचर सेरेमनी कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात शाळेच्या हेड बॉय, हेड गर्ल, स्कूल सेक्रेटरी तसेच यलो, रेड, ग्रीन आणि ब्ल्यू हाऊसच्या कॅप्टन व प्रतिनिधींची नियुक्ती करण्यात आली. निवड झालेल्या सर्व विद्यार्थी अत्यंत उत्साहात शपथविधी करून आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक अमोल सातोदकर हे होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन व दीपप्रज्वलन पोलीस निरीक्षक अमोल सातोदकर, शाळेचे मुख्याध्यापक फादर टेनी परक्का, सिस्टर ज्ञानसी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पोलीस निरीक्षक अमोल सातोदकर यांनी इन्व्हेस्टिचर सेरेमनीचे महत्त्व, नेतृत्वगुण, शिस्त, जबाबदारी




आणि प्रामाणिकपणा याविषयी प्रेरणादायी विचार व्यक्त केले. विद्यार्थ्यांना आपल्या पदाची जबाबदारी समजून आदर्श नेतृत्व करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ललिता वराडे व सोनाली उपासने यांनी केले. आभार शीतल बोरदे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे हाऊस प्रमुख योगेश थोरात, मुदस्सर शेख, पीटर छिनप्पा, मनोज वसईकर, क्रीडा शिक्षक डॉ.दिनेश बैसाणे, सर्व विभागप्रमुख व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

# नवापूरच्या योगेश पाटील यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी नियुक्ती



नवापूर (प्रतिनिधी) : नवापूर येथील युवा कार्यकर्ते योगेश राजेंद्र पाटील (गोलू राजपूत) यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) संलग्न महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांनी ही नियुक्ती जाहीर केली असून, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरदचंद्र पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खा. सुप्रियाताई सुळे तसेच प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

योगेश पाटील (गोलू राजपूत) हे अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी युवक काँग्रेसमध्ये सक्रियपणे कार्यरत असून युवकांमध्ये त्यांचा मोठा जनसंपर्क आहे. विविध सामाजिक आणि राजकीय उपक्रमांमध्ये त्यांनी सातत्याने सहभाग घेत पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी योगदान दिले आहे. त्यांच्या संघटन कौशल्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर महाराष्ट्र प्रदेश सचिवपदाची जबाबदारी सोपविली आहे.

या नियुक्तीमुळे नंदुरबार जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्रातील युवक संघटनेला नवे नेतृत्व मिळणार असून पक्षाची संघटनात्मक ताकद अधिक वाढेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

नियुक्तीप्रसंगी विद्यार्थी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष भोला सैंदाणे तसेच धुळे जिल्हाध्यक्ष डॉ. कुणाल पाटील उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी योगेश पाटील यांचा सत्कार करून पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

नियुक्तीनंतर बोलताना योगेश पाटील यांनी पक्ष नेतृत्वाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

पक्षाने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत युवकांना पक्षाशी जोडणे, तळागाळापर्यंत संघटना अधिक सक्षम करणे आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करणे, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, त्यांच्या या नियुक्तीबद्दल नवापूर शहरासह संपूर्ण नंदुरबार जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# नवापूर शहरातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान ठरलेले नवसाला पावणारे श्री आई महालक्ष्मी मातेचे जागृत शक्तीपीठ संस्थापक भक्त हिरालाल ढोले व बंधू सुरेश ढोले, कचरू चव्हाण यांच्या अथक सेवेतून उभारले गेले पवित्र देवस्थान

नवापूर (प्रतिनिधी)– नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर शहरापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ लगत, अवधूत सॉ मिलच्या पाठीमागील निसर्गरम्य व शांत परिसरात विराजमान असलेले श्री आई महालक्ष्मी माता मंदिर हे आज महाराष्ट्र व गुजरात राज्यातील हजारो भाविकांचे अढळ श्रद्धास्थान बनले आहे. नवसाला पावणारी आणि भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणारी जागृत देवी म्हणून या मंदिराची सर्वदूर ख्याती असून, दररोज शेकडो भाविक दर्शनासाठी येथे येत असतात. या पवित्र देवस्थानाच्या स्थापनेमागे संस्थापक भक्त हिरालाल ढोले (भोई) यांना आलेला श्री आई महालक्ष्मी मातेचा दिव्य दृष्टांत असल्याचे सांगितले जाते. मातेच्या आदेशानुसार हिरालाल ढोले यांनी या ठिकाणी मंदिर उभारण्याचा दृढ संकल्प केला. या धार्मिक कार्यात त्यांचे बंधू सुरेश ढोले यांनी प्रत्येक टप्प्यावर खांद्याला खांदा लावून मोलाचे सहकार्य केले. संस्थापक हिरालाल ढोले यांच्या भक्ती, श्रद्धा आणि समर्पणामुळेच या पवित्र शक्तीपीठाचा पाया रचला गेला, तर सुरेश ढोले यांच्या सातत्यपूर्ण सेवेमुळे मंदिराचा धार्मिक वारसा अधिक दृढ झाला. तसेच कचरू चव्हाण यांच्या सहकार्यामुळे श्री आई महालक्ष्मी मातेची विधीवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या संपूर्ण धार्मिक कार्यात संस्थापक हिरालाल ढोले आणि त्यांचे बंधू सुरेश ढोले यांनी घेतलेले अथक परिश्रम आजही भाविक आदराने



स्मरण करतात. मंदिराच्या स्थापनेपासून आजपर्यंत हिरालाल ढोले व सुरेश ढोले यांनी जोपासलेली भक्ती, सेवा आणि समर्पणाची परंपरा अखंडपणे सुरू आहे. श्री आई महालक्ष्मी माता मंदिराच्या स्थापनेपासून आजपर्यंत हजारो भाविकांनी येथे नवस करून आपल्या मनोकामना पूर्ण झाल्याचे अनुभव व्यक्त केले आहेत. नोकरी, व्यवसाय, आरोग्य, शिक्षण, विवाह, संततीप्राप्ती, आर्थिक प्रगती, कौटुंबिक सुख-समृद्धी तसेच विविध संकटांमधून मार्ग मिळावा या श्रद्धेने भाविक मातेच्या चरणी नवस अर्पण करतात. नवस पूर्ण झाल्यानंतर ओटी भरणे, साडी-चोळी अर्पण करणे, महाप्रसाद, महाआरती तसेच विविध धार्मिक सेवा करून भक्त आपली कृतज्ञता व्यक्त करतात. गुरुवार, शुक्रवार, पौर्णिमा, अमावस्या तसेच शारदीय व चैत्र नवरात्रोत्सवाच्या काळात मंदिरात मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होत असते. या काळात आकर्षक विद्युत रोषणाई, फुलांची भव्य सजावट, अलंकारपूजा, घटस्थापना, दुर्गासप्तशती पारायण, महाआरती, भजन-कीर्तन, जागरण, महाप्रसाद तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन भक्तिभावाने केले जाते. या सर्व धार्मिक उपक्रमांमधून संस्थापक हिरालाल ढोले यांनी रुजविलेली भक्तीपरंपरा आणि बंधू सुरेश ढोले यांनी जपलेला सेवाभाव आजही अखंडपणे पुढे नेला जात आहे. आज मंदिराच्या प्रगतीमध्ये संस्थापक हिरालाल ढोले यांच्या दूरदृष्टीचा आणि बंधू सुरेश ढोले यांच्या सातत्यपूर्ण योगदानाचा मोठा वाटा असल्याचे भाविक आवर्जून सांगतात. मंदिर परिसराच्या विकासापासून ते धार्मिक कार्यक्रमांच्या आयोजना पर्यंत हिरालाल ढोले आणि सुरेश ढोले यांनी केलेले कार्य भाविकांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. यावेळी श्री आई महालक्ष्मी माता मंदिर समितीच्या वतीने सुरेश ढोले, कचरू ढोले, हरीश पाटील व दर्शन ढोले यांनी महाराष्ट्र व गुजरात राज्यातील सर्व भाविकांना श्री आई महालक्ष्मी मातेच्या पवित्र दर्शनाचा लाभ घेण्याचे तसेच मंदिरात आयोजित करण्यात येणाऱ्या धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

शेवटी मंदिर समितीच्या वतीने संस्थापक हिरालाल ढोले यांच्या भक्तीमय संकल्पाला आणि बंधू सुरेश ढोले यांच्या सेवाभावी कार्याला अभिवादन करण्यात आले. श्री आई महालक्ष्मी मातेच्या कृपेने प्रत्येक भक्ताच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी, आरोग्य आणि आनंद नांदो, अशी प्रार्थना करण्यात आली.

# धानातून समृद्धीकडे !

## आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारा भरघोस उत्पादन, आर्थिक स्वावलंबन आणि कर्जमुक्तीकडे आत्मविश्वासाने वाटचाल करा!

शेतकरी जगला तरच जग जगेल ही केवळ भावना नाही, तर आपल्या देशाच्या अस्तित्वाची खरी ओळख आहे. कारण शेतकरी हा केवळ अन्नदाता नाही; तो राष्ट्राचा जीवनदाता आहे. उन्हाची तिरीप, पावसाची अनिश्चितता, वादळाचे संकट, किडींचा प्रादुर्भाव आणि बाजारातील चढ–उतार या सर्वांशी दोन हात करत तो प्रत्येक हंगामात नव्या आशेचे बी पेरत असतो. त्याच्या हातात असलेली मूठभर बियाणे ही केवळ धान्याची नसतात; ती त्याच्या मुलांच्या शिक्षणाची, कुटुंबाच्या आनंदाची, आई–वडिलांच्या औषधांची, घराच्या स्वप्नांची आणि उद्याच्या उज्ज्वल भविष्याची बीजे असतात.

धानाचे एक छोटेसे रोप शेतात उभे राहताना अनेक संघर्षांची साक्ष देत असते. त्या रोपामागे असतो शेतकऱ्याचा घाम, कष्ट, संयम आणि निसर्गावरचा अढळ विश्वास. म्हणूनच धानाची शेती ही फक्त शेती नसून ती जीवन जगण्याची एक संस्कृती आहे. शेतकऱ्याच्या हातातील प्रत्येक रोप हे त्याच्या आशेचे प्रतीक असते. पावसाच्या प्रत्येक सरीसोबत त्याची स्वप्नेही रुजत असतात आणि कणसांमध्ये त्याच्या कष्टांचे सोनं दडलेले असते.

मात्र आज शेतीसमोर अनेक नवीन आव्हाने उभी आहेत. हवामान बदलामुळे पावसाचा लहरीपणा वाढला आहे. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ, कधी रोग–किडींचा प्रादुर्भाव तर कधी उत्पादन खर्चात सातत्याने होणारी वाढ या सगळ्याचा सर्वाधिक परिणाम शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीवर होत आहे. अनेकदा वर्षभराच्या कष्टानंतरही अपेक्षित उत्पादन मिळत नाही आणि शेतकरी पुन्हा कर्जाच्या ओझ्याखाली दबला जातो. पण संकट कितीही मोठे असले तरी आशा संपत नाही. कारण भारतीय शेतकरी हा संकटांवर मात करून पुन्हा नव्याने उभा राहण्याची ताकद ठेवतो.

परंतु प्रत्येक संकटामध्ये एक संधीही दडलेली असते. आज कृषी विज्ञानाने धान लागवडीसाठी अनेक आधुनिक, शास्त्रीय आणि उत्पादनक्षम तंत्रज्ञान विकसित केले आहे. या तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास उत्पादन वाढविणे, खर्च कमी करणे आणि शेती अधिक फायदेशीर बनविणे पूर्णपणे शक्य आहे. बदलत्या काळात विज्ञानाची साथ हीच शेतीच्या प्रगतीची खरी गुरुकिल्ली ठरत आहे.

धान उत्पादनात घट होण्याची प्रमुख कारणे म्हणजे उशिरा होणारी रोपणी, निकृष्ट किंवा प्रक्रिया न केलेले बियाणे, रोग–किडींचा प्रादुर्भाव, तणांचे वाढते प्रमाण, असंतुलित खतांचा वापर आणि पाण्याचे अयोग्य व्यवस्थापन. ही सर्व कारणे आपण योग्य नियोजन आणि वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करून सहज दूर करू शकतो.

योग्य कालावधीत लागवड करणे, आपल्या भागासाठी शिफारस केलेल्या सुधारित वाणांची निवड करणे, पेरणीपूर्वी बियाण्यांवर प्रक्रिया करणे, योग्य अंतरावर रोपांची लागवड करणे, संतुलित सेंद्रिय व रासायनिक खतांचा वापर करणे, वेळेवर तण नियंत्रण करणे आणि पाण्याचे काटेकोर नियोजन करणे–या साध्या वाटणाऱ्या उपाययोजना उत्पादनात मोठी वाढ घडवून आणतात. योग्य वेळी घेतलेला प्रत्येक निर्णय शेतकऱ्याच्या उत्पन्नात सकारात्मक बदल घडवून आणू शकतो.

विशेषतः श्री (SRI - System of Rice Intensification) ही आधुनिक लागवड पद्धत धान शेतीत एक क्रांती घडवून आणणारी ठरत आहे. या पद्धतीत कमी बियाणे, कमी पाणी, अधिक फुटवे, मजबूत मुळे, भरघोस कणसे आणि पारंपरिक पद्धतीपेक्षा लक्षणीय अधिक उत्पादन मिळते. त्याचबरोबर मजुरीचा आणि उत्पादन खर्चाचाही मोठ्या प्रमाणात बचत होते. आज अनेक प्रगतशील शेतकरी या पद्धतीचा अवलंब करून उत्कृष्ट आर्थिक यश मिळवत आहेत. ही पद्धत केवळ उत्पादन वाढवत नाही, तर शेतकऱ्याच्या आत्मविश्वासालाही नवी उभारी देते.

याशिवाय पेरसाण पद्धत, जपानी लागवड, ड्रम सीडरचा वापर, सुधारित रोप व्यवस्थापन, सेंद्रिय खतांचा अधिक वापर, हिरवळीच्या खतांचा समावेश आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांचे संतुलित व्यवस्थापन यामुळे मातीचे आरोग्य सुधारते. निरोगी माती म्हणजे निरोगी पीक, आणि निरोगी पीक म्हणजे अधिक उत्पादन. मातीची सुपीकता टिकवून ठेवणे म्हणजे पुढील अनेक पिढ्यांसाठी समृद्धीची बीजे पेरणे होय.

धान हे पाण्यावर आधारित पीक असले तरी सतत पाणी साचवून ठेवणे आवश्यक नसते. योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात पाणी दिल्यास पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होते. यामुळे उत्पादनावर सकारात्मक परिणाम होतो आणि नैसर्गिक संसाधनांचेही संरक्षण होते. आजच्या बदलत्या हवामानात पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविणे हीच भविष्यातील शेतीची गुरुकिल्ली आहे.

शेतकरी बंधूंनो, आज माहितीचे युग आहे. कृषी विज्ञान केंद्र, कृषी विद्यापीठे, कृषी विभाग, प्रगतशील शेतकरी आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा लाभ घेऊन आपण आपल्या शेतीत मोठा बदल घडवू शकतो. परंपरेचा अभिमान ठेवत विज्ञानाची साथ घेतली तर शेती अधिक सक्षम, टिकाऊ आणि नफ्याची होईल.

आजचा शेतकरी फक्त कष्टकरी नसून तो संशोधकही आहे. प्रत्येक हंगाम त्याला काहीतरी नवीन शिकवतो. अपयशातून अनुभव, अनुभवातून ज्ञान आणि ज्ञानातून यश मिळते. म्हणूनच बदल स्वीकारण्याची तयारी ठेवणारा शेतकरीच उद्याचा यशस्वी शेतकरी ठरेल.

लक्षात ठेवा धानाचे प्रत्येक रोप तुमच्या कष्टांचा साक्षीदार आहे. प्रत्येक कणसात तुमच्या घामाचा सुवास आहे.

प्रत्येक दाण्यात तुमच्या कुटुंबाच्या स्वप्नांचे भविष्य दडलेले आहे. म्हणून शेतीकडे केवळ उपजीविकेचे साधन म्हणून पाहू नका; ती एक उद्योग आहे, विज्ञान आहे आणि समृद्धीकडे नेणारा सर्वात विश्वासार्ह मार्ग आहे.

आजचा काळ हा आधुनिक शेतीचा आहे. जो शेतकरी विज्ञानाचा हात धरतो, तोच काळाच्या पुढे जातो. आधुनिक लागवड तंत्रज्ञान, सुधारित वाण, संतुलित खत व्यवस्थापन, पाण्याचा काटेकोर वापर आणि योग्य नियोजन यांच्या बळावर धान शेती अधिक उत्पादनक्षम, अधिक फायदेशीर आणि अधिक शाश्वत होऊ शकते.

आज घेतलेला एक वैज्ञानिक निर्णय उद्याच्या अनेक संकटांपासून आपले संरक्षण करू शकतो. आज केलेली आधुनिक शेती उद्या आपल्या मुलांचे शिक्षण, कुटुंबाचे सुख आणि आर्थिक सुरक्षिततेचा मजबूत पाया ठरू शकते. कारण शेतीतील प्रत्येक योग्य निर्णय हा केवळ उत्पादन वाढवत नाही, तर शेतकऱ्याचा आत्मविश्वासही वाढवतो.

लक्षात ठेवा कर्जमुक्तीचा मार्ग केवळ कर्जमाफीत नसतो; तो भरघोस उत्पादनात, कमी उत्पादन खर्चात, शास्त्रशुद्ध शेतीत आणि योग्य नियोजनात असतो. जेव्हा शेतातील प्रत्येक एकर अधिक उत्पादन देईल, प्रत्येक कणसाला योग्य बाजारभाव मिळेल आणि प्रत्येक हंगाम नफ्याचा ठरेल, तेव्हाच शेतकरी खऱ्या अर्थाने आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल. कर्जाचे ओझे हलके होईल, मुलांच्या शिक्षणाची स्वप्ने पूर्ण होतील, कुटुंबाच्या चेहऱ्यावर समाधान फुलेल आणि शेतकऱ्याचा स्वाभिमान नव्या उंचीवर पोहोचेल.

चला यंदाच्या खरीप हंगामात एक नवा संकल्प करूया. आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारूया, शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेऊया, धानाचे भरघोस उत्पादन घेऊया आणि आपल्या कष्टाला समृद्धीची नवी दिशा देऊया. प्रत्येक शेत हिरवेगार बहरो, प्रत्येक कणसात सोन्यासारखे धान भरू दे, प्रत्येक शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलू दे आणि प्रत्येक कुटुंब कर्जमुक्त, स्वाभिमानी व समृद्ध होऊ दे हीच मनःपूर्वक सदिच्छा

**रणजितसिंह राजपूत,**
**जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार**

# आरोग्य वार्ता

## पावसात भिजल्यानंतर लगेच करा ही ५ कामे; आजारांपासून राहाल दूर



पावसात भिजण्याचा आनंद वेगळाच असतो, पण त्यासोबतच सर्दी, खोकला, ताप किंवा संसर्ग होण्याचा धोकाही वाढतो. पावसात भिजल्यानंतर तुम्ही स्वतःची कशी काळजी घेता, यावर तुमचे आरोग्य अवलंबून असते.पावसात भिजल्यानंतर आजारांपासून दूर राहण्यासाठी लगेच करा ही ५ महत्त्वाची कामे:

**१. ओले कपडे त्वरित बदला–** घरी आल्या आल्या सर्वात आधी तुमचे ओले झालेले कपडे आणि अंतर्वस्त्रे बदला. ओल्या कपड्यांमुळे शरीराचे तापमान अचानक कमी होते, ज्यामुळे सर्दी–खोकला होऊ शकतो. तसेच, ओलसरपणामुळे त्वचेला बुरशीजन्य संसगचा धोका असतो.

**२. कोमट पाण्याने स्वच्छ अंघोळ करा–** पावसाच्या पाण्यात अनेक प्रकारचे जंतू आणि प्रदूषण असते. त्यामुळे घरी आल्यावर कोमट पाण्याने (जमल्यास अँटीसेप्टिक लिक्विड टाकून) अंघोळ करा. यामुळे शरीरावरील जंतू निघून जातील आणि शरीराचे तापमान नियंत्रित राहण्यास मदत होईल. अंघोळीनंतर शरीर आणि केस टॉवेलने व्यवस्थित कोरडे करा.

**३. गरम पाण्याचे किंवा काढ्याचे सेवन करा–** अंघोळ झाल्यानंतर शरीराला आतून उबदारपणा मिळणे गरजेचे असते. यासाठी एक कप गरम पाणी, गवती चहा, आल्याचा चहा किंवा तुळशी–मिरपूड टाकलेला कढा प्या. यामुळे शरीराची प्रतिकारशक्ती वाढते आणि घशातील संसर्ग रोखण्यास मदत होते.

**४. पाय स्वच्छ धुवा आणि कोरडे करा–** अनेकदा आपण छत्री वापरतो, ज्यामुळे शरीर वाचते पण पाय पूर्णपणे भिजतात. रस्त्यावरील साचलेल्या पाण्यातून चालल्यामुळे पायांना बॅक्टेरियल इन्फेक्शन होऊ शकते. म्हणूनच पाय साबणाने स्वच्छ धुवून, कोरडे करून त्यांना एखादे मॉइश्चरायझर किंवा अँटी–फंगल पावडर लावा.

५. केस पूर्णपणे कोरडे करा

ओल्या केसांमुळे डोके दुखणे, सर्दी होणे किंवा टाळूला संसर्ग होण्याचा धोका असतो. त्यामुळे भिजल्यानंतर केस अजिबात ओले ठेवू नका. टॉवेलने किंवा ड्रायरने केस व्यवस्थित वाळवून घ्या. केस ओले असताना लगेच झोपू नका.**टीप:** जर तुम्हाला पावसात भिजल्यानंतर अंगदुखी किंवा ताप आल्यासारखे वाटत असेल, तर डॉक्टरांच्या सल्ल्यानेच औषध घ्या. स्वतःच्या मनाने कोणतेही अँटीबायोटिक्स घेऊ नका.

## मुलं सतत थकतात का? निमियाची ही लक्षणे असू शकतात, जाणून घ्या उपाय

निमिया ही भारतातील एक सामान्य आरोग्य समस्या आहे, जी पोषक तत्वांच्या कमतरतेमुळे आणि लोहयुक्त पदार्थांच्या अभावामुळे होते. जेव्हा शरीरात लाल रक्तपेशी, म्हणजेच हिमोग्लोबिनची कमतरता असते, तेव्हा निमिया होतो. निमियाचा परिणाम संपूर्ण शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होतो.

यामुळे अशक्तपणा, थकवा, डोकेदुखी, चक्कर येणे, हातपाय थंड पडणे, श्वास घेण्यास त्रास होणे आणि चेहरा व ओठ फिकट पडणे अशी लक्षणे दिसू शकतात. यावर उपचार न केल्यास, ही स्थिती गंभीर होऊ शकते आणि त्यामुळे हृदयाच्या समस्यादेखील उद्भवू शकतात.

हे टाळण्यासाठी, हिरव्या पालेभाज्या, बीट, डाळिंब, सफरचंद, गूळ, डाळी आणि सुकामेवा यांसारख्या लोह आणि फॉलिक सिडने समृद्ध आहाराचे सेवन करणे महत्त्वाचे आहे. तसेच, संत्री, आवळा आणि लिंबू यांसारखी व्हिटॅमिन सी ने समृद्ध फळे खावीत, कारण त्यामुळे लोहाच्या शोषणात मदत होते

**मुलांमधील निमियाची लक्षणे**

**थकवा आणि अशक्तपणा**

निमिया असलेल्या मुलांना लवकर थकवा येतो आणि त्यांना खूप अशक्तपणा जाणवतो, ज्यामुळे ते सतत सुस्त राहतात. लोहाच्या कमतरतेमुळे सतत झोप येणे आणि अभ्यासात रस नसणे ही लक्षणेही दिसतात. जर तुमच्या मुलामध्ये ही लक्षणे दिसत असतील, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

**त्वचा आणि ओठ पिवळे पडणे**

निमियामुळे मुलांचे ओठ आणि त्वचा फिकट पडू शकते, ज्यामुळे त्यांचा चेहरा निस्तेज दिसतो. जर तुमच्या मुलाची त्वचा फिकट असल्याचे तुमच्या लक्षात आले, तर याचा अर्थ तुमच्या मुलामध्ये हिमोग्लोबिनची कमतरता असू शकते. रक्त तपासणीसाठी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

**वारंवार आजारी पडणे**

जर तुमचे मूल वारंवार आजारी पडत असेल, तर हे निमियाचे (रक्तक्षयाचे) लक्षण असू शकते. लोहाच्या कमतरतेमुळे रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होते, ज्यामुळे आजारपण आणि संसर्गाचा धोका वाढतो. जर तुमचे मूल वारंवार आजारी पडत असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.




**चिडचिड**

मुलांमधील निमियाचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरही नकारात्मक परिणाम होतो , ज्यामुळे ते चिडचिडे होतात आणि त्यांना अभ्यासात लक्ष केंद्रित करता येत नाही किंवा खेळांमध्ये फारसा रस वाटत नाही.

**श्वसन त्रास–**निमिया असलेल्या मुलांना अनेकदा श्वास घेण्यास त्रास होतो. बऱ्याचदा, जेव्हा मुले खेळ किंवा इतर क्रियाकलाप करतात, तेव्हा त्यांना धाप लागते आणि ते लवकर थकतात. जर तुमच्या मुलामध्ये ही लक्षणे दिसत असतील, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका.

## पावसाळ्यात निरोगी राहायचंय? मग आजच टाळा ह्या ६ गंभीर चुका; नाहीतर पडाल आजारी!

पावसाळा हा ऋतू जितका आल्हाददायक आहे, तितकाच तो आरोग्याच्या दृष्टीने संवेदनशील मानला जातो. या दिवसांत हवेतील दमटपणा आणि प्रदूषित पाणी यांमुळे संसर्ग आणि बॅक्टेरियाचा प्रादुर्भाव खूप वेगाने वाढतो. पावसाळ्यात आपल्याकडून नकळत होणाऱ्या काही चुका आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक ठरू शकतात. त्या कोणत्या, ते खालीलप्रमाणे जाणून घेऊया:

**पावसाळ्यात आवर्जून टाळाव्यात अशा ६ गंभीर चुका**

**१. अस्वच्छ किंवा उघड्यावरील पाणी पिणे**

पावसाळ्यात जलजन्य आजारांचा धोका सर्वाधिक असतो. दूषित पाण्यामुळे कावीळ, टायफॉइड, कॉलरा आणि गॅस्ट्रो यांसारखे गंभीर आजार होतात.

**चूक:** बाहेरचे, फिल्टर न केलेले किंवा न उकळलेले पाणी पिणे.

**योग्य काय?:** घरात नेहमी पाणी कमीत कमी १० ते १५ मिनिटे उकळून आणि गाळून घ्यावे. बाहेर जाताना स्वतःची पाण्याची बाटली सोबत ठेवावी.

**२. रस्त्यावरील उघडे अन्न आणि स्ट्रीट फूड खाणे**

पावसाळ्यात रस्त्या कडेला मिळणारे चाट, समोसे किंवा वडापाव खाण्याचा




मोह अनेकांना होतो, पण ही चूक महागात पडू शकते.

चूक: उघड्यावरील अन्न खाणे. या हवेत माश्या आणि जीवाणू खूप वेगाने अन्नावर बसतात, ज्यामुळे 'फूड पॉयझनिंग' होते.

**योग्य काय?:** घरचे ताजे आणि गरम अन्न खाण्याला प्राधान्य द्या.

३. पालेभाज्यांची योग्य निवड न करणे

आयुर्वेदात आणि आधुनिक विज्ञानातही पावसाळ्यात काही विशिष्ट भाज्या टाळण्यास सांगितले जाते.

चूक: बाजारातून आणलेल्या पालेभाज्या (पालक, मेथी, कोबी) नीट न धुता खाणे. पावसाळ्यात या भाज्यांवर बारीक किडे, अळ्या आणि बॅक्टेरियाचे प्रमाण जास्त असते.

योग्य काय?: पालेभाज्या खाणे काही दिवस टाळावे किंवा खायच्या असल्यास त्या कोमट पाण्यात मीठ टाकून अत्यंत स्वच्छ धुवून आणि पूर्ण शिजवून खाव्यात.

४. घराभोवती पाणी साचू देणे

पावसाळ्यात डेंग्यू आणि मलेरियासारख्या जीवघेण्या आजारांचा प्रसार डासांमुळे होतो.

चूक: गॅलरीतील कुंड्या, कुलर, घरासमोरील खड्डे किंवा छतावरील टायर/प्लास्टिकमध्ये पावसाचे पाणी साचून राहू देणे. साचलेल्या स्वच्छ पाण्यात डेंग्यूचे डास अंडी घालतात.

योग्य काय?: आठवड्यातून एकदा घराभोवती कोरडा दिवस पाळावा. कोठेही पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी.

५. ओल्या कपड्यांमध्ये किंवा एसीमध्ये जास्त वेळ राहणे

चूक: पावसात भिजल्यानंतर कपडे न बदलता तसेच सुकू देणे किंवा लगेच एसी (–उ) मध्ये जाऊन बसणे.

कारण: यामुळे शरीराचे तापमान अचानक बदलते, ज्यामुळे सर्दी, खोकला, न्यूमोनिया किंवा फंगल इन्फेक्शन (त्वचेचे आजार) होण्याचा धोका वाढतो.

योग्य काय?: भिजल्यास लगेच अंग कोरडे करून गरम कपडे घालावेत.

६. रोगप्रतिकारक शक्तीकडे दुर्लक्ष करणे

या ऋतूत शरीराची पचनशक्ती आणि रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते.

चूक: अति थंड पदार्थ, फ्रीजमधील पाणी किंवा पचायला जड असलेले (तामसिक/तेलकट) अन्न सतत खाणे.

योग्य काय?: आहारात आले, लसूण, हळद, काळी मिरी आणि गरम काढ्याचा वापर वाढवावा, जेणेकरून शरीराची प्रतिकारशक्ती मजबूत राहील.

## दररोज सकाळी रिकाम्या पोटी भिजवलेले खजूर खा, फायदे मिळतील



रिकाम्या पोटी खजूर खाण्याचे अनेक फायदे आहेत. हे स्वस्त आणि पौष्टिक अन्न आहे जे सहज मिळू शकते. नियमितपणे खजूर खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे होतात.

चला जाणून घेऊया रिकाम्या पोटी खजूर खाण्याचे काय फायदे आहेत.

**१. अँटिऑक्सिडंट्स आणि फायबरची उच्च पातळी:**

सर्वप्रथम, खजूरमध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि फायबरचे प्रमाण जास्त असते. अँटिऑक्सिडंट्स शरीरातील हानिकारक मुक्त रॅडिकल्स नष्ट करतात आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. फायबर आतड्यांचे आरोग्य सुधारते आणि बद्धकोष्ठता दूर करते.

**२. जास्त प्रमाणात प्रथिने:**

याशिवाय खजूरमध्ये मोठ्या प्रमाणात प्रथिने असतात. प्रथिने शरीरासाठी आवश्यक पोषक असतात जे स्नायू तयार करण्यास आणि दुरुस्त करण्यास मदत करतात.